म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा. वा.
दा. क्र. : १२६७

BVBK-0401867

# एक

धुवांधार पाऊस पडत होता. वीरेन्द्र अंग चोरून आडोशाला बसला होता. छपरावरून कोसळणाऱ्या असंख्य पागोळ्यांची संतत धार लागली होती.त्या असंख्य, अगणित धारा काचेच्या फुंकण्याच्या पड्यासारख्या चकचकीत, गोल गोल, वाटोळ्या दिसत होत्या. क्षणाक्षणाला पावसाचा वेग वाढत होता. वाऱ्याच्या किंचित स्पर्शाने तो रुपेरी पडदा मधूनच हिंदोळत होता.

त्या पड्याआडून समोर असलेल्या दुकानांव्यतिरिक्त काहीही दिसत नव्हते. दुकानांच्या लगतच प्रचंड पहाड होता, आणि वीरेन्द्र ज्या घराच्या आडोशाला बसला होता त्याच्या पाठीशी खूप मोठी पर्वतकपार होती.

दोन कपारींच्या बेचक्यात वसलेले हे हिमालयातले सोनप्रयाग. इथले हवामान म्हणजे लहरी. कुठलाच ऋतू इथे स्थिर नसतो. निसर्ग आपले रूप लहरीप्रमाणे बदलतो.

एका तासापूर्वी सोनप्रयागला निरभ्र आणि स्वच्छ आभाळ होते. पावसाचा तर मागमूसही नव्हता; आणि हा पाऊस अचानक कोसळू लागला. अगदी समरसून तो कोसळत होता.

वीरेन्द्र कालच आपल्या चार सवंगड्यांसह सोनप्रयागला आला होता. नुकतीच बद्रिकेदारची यात्रा सुरू झाली होती. श्रीकेदारनाथाचे मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले होते.

वीरेन्द्र आणि त्याचे मित्र पोटापाण्याच्या व्यवसायासाठी पहाडी मुलुखातून काही दिवस इथे वस्तीला आले होते. त्यांच्याचसारखे अनेकजण नेपाळी, गुरखे व पहाडी लोक पोट भरण्यासाठी येथे आले होते. इथली गर्दी वाढली होती. धान्याची कणगी उघडावी व त्यांत असंख्य पोरकिडे वळवळावेत त्याप्रमाणे त्या चिमुकल्या सोनप्रयागला गर्दी, गिचमीड झाली होती.

त्यांत दंडीवाले आणि त्यांच्या दंड्या, कंडीवाले आणि त्यांच्या कंड्या, घोडेवाले आणि त्यांची पहाडी जातीची ठेंगणी ठुसकी पण काटक घोडी, सामान वाहणारे हमाल आणि असंख्य प्रवासी मंडळी आली होती. ओसाड गावात जत्रा भरावी तशी एकदम गर्दी झाली होती. दुकानदार आणि इतर व्यावसायिक पण मालाच्या विक्रीसाठी आले होते. हिमालय चढण्यासाठी काठीचा आधार हवा म्हणून काठीवाले आले होते. अचानक येणाऱ्या पावसापासून संरक्षण करण्यासाठी रेनकोट हवेत म्हणून त्याच्या विक्रीसाठी काहीजण आले होते. सीझनल हॉटेलवाले होते, फोटो काढणारे होते, खेळणी विकणारे होते. ज्याला जो व्यवसाय जमेल आणि झेपेल ते सारे आले होते.

हिमालयाच्या बेचक्यातले हे इवलेसे खेडे. इथे सपाटीचा रस्ता नव्हता की पक्क्या बांधणीची घरे नव्हती. तात्पुरती, सीझनपुरती तंबूकॉलनी उभारली होती व झावळ्यांची शाकारलेली कुडाची दुकानवजा घरे होती.

अचानक आलेला पाऊस निर्लज्ज पाहुण्याप्रमाणे निःसंकोच पडत होता. वीरेन्द्राला वाटले, समोरच्या रस्त्यावर थोड्या वेळा-पूर्वी असंख्य माणसे आणि जनावरे वावरत होती, इकडे-तिकडे बघायला वाट सापडत नव्हती, तोच हा रस्ता आता त्या

BVBK-0401867


पावसामुळे अगदी निर्मनुष्य झाला आहे. पाऊसधारा मनसोक्त त्यावर वावरत आहेत आणि स्वैरपणे पुढे घरंगळत आहेत.

कुठे सामावली सारीजण ? कुठे गडप झाली सर्व माणसे ?

वळचणीवर पाखरांनी दाटीवाटीने बसावे तशी ही माणसे सापडेल त्या आडोशाला गेली असावीत व पावसापासून आपले रक्षण करण्याची धडपड करीत असावी.

वीरेन्द्र ' वूड हाऊस 'च्या भिंतीच्या आडोशाला बसला होता. सहज चाळा म्हणून त्याने आपला तळहात पागोळीखाली धरला. पडणाऱ्या धारेचा वेग इतका वेगवान होता, की तळहातावर टेकणारी धार असंख्य पटींनी पुन्हा उंच उडत होती. तळहातावर जणू कारंजे निर्माण झाले होते.

वीरेन्द्राच्या विचारधारेला अशी गती आली होती आणि तिला अडथळा आला की गतिमान धार असंख्य तुषार उडवीत होती. मग ते विचारांचे तुषार अडविणे अवघड आणि अशक्य होत होते.

पहाडी मुलुखातला मी गरीब घरचा मुलगा. दोन वर्षांपासून इथे रोजगारासाठी येतो आहे. अक्षरशः ' कुली 'चे अंगमेहनतीचे काम करून पोटाची खळगी भरतो आहे. त्या सीझनमध्ये मी रक्त ओकेपर्यंत शारीरिक कष्ट करतो, पण माझ्या परिस्थितीत सुधारणा नाही. असे किती वर्षे मी इथे येणार आणि ती राक्षसी ताकत माझ्या पायांत किती वर्षे राहणार ?

ही यात्रा करून पैसे गाठीला बांधून मी वापस घरी जातो; पण नेलेल्या पैशांत वर्षभर पुरेल इतके धान्यसुद्धा येत नाही. वर्षभराचा कपडा होत नाही की जुनी खिळखिळी झालेली झोपडी दुरुस्त करणे जमत नाही. मग ही ढोरमेहनत कशाला करायची ?

खरे म्हणजे मला गेल्या वर्षी वाटत होते, की यंदा मिळालेला पैसा भांडवल म्हणून यंदा वापरायचा व लहान का होईना पण धंदा करायचा. पण घरच्या दैन्याची भगदाडे बुजविता बुजविता तो चुटकीसरशी संपला. यंदा मी माझ्या बापाला म्हटले की, 'मला थोडं भांडवल मिळवून द्या. मी हमाली न करता काही व्यवसाय करतो. त्यात अंगमेहनत कमी आणि फायदा जास्ती मिळेल.'

पण बापाला ते पटले नाही.

ते म्हणाले, 'धंदा करना आसान बात नहीं है. उसे अक्कल चाहिये, हिसाबपानी आना चाहिये. तुला काय जमणार डोंबलं? अरे, लाखाचे बारा हजार करून येशील! बिनभांडवली आहे हा 'कुली'चा धंदा बरा आहे.'

हे ऐकताच वीरेन्द्राच्या विचारधारेला असंख्य घुमारे फुटले. त्याला तर बापाची चीडच आली. स्वतः तर दैन्यावस्थेत संसार केलाच, पण मलासुद्धा चांगली संधी घेऊ देत नाहीत. म्हणे मला हिसाबठिसाब येत नाही! मग मला त्यांनी का शाळेत घातले नाही? आणि साधा व्यवहार मला कळणार नाही का? म्हणे मी लाखाचे बारा हजार करीन!

मला साधी सील करण्याची लाख माहीत नाही आणि हे मला लाख रुपयांचे भय दाखवीत आहेत.

मागच्या वर्षी पोटाला चिमटा घेऊन आणि श्रमांची पर्वा न करता मी कमाई केली आणि ते पैसे मी बाजूला ठेवायला लागलो तर आई केवढ्यांदा किंचाळली! म्हणाली,

'ते पैसे काय आमच्या मयतीसाठी ठेवतो आहेस का? अरे बाबा, पैसे शिल्लक ठेवून आम्ही खायचं काय? तू यात्रा करून

येईपर्यंत आम्ही तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलो होतो. आता मुकाटच्यानं सर्व पैसे तू ह्यांच्याजवळ दे, म्हणजे हे कर्जफेड करतील व मग पुन्हा उधारीवर धान्य आणतील.'

वीरेन्द्राला असा काही रागाचा झटका आला ! त्याला वाटले, हे पैसे घेऊन आपण असेच घराबाहेर पडावे व आपले भविष्य आपण घडवावे. त्या मंडळींना कितीही दिले तरी समाधान नाही. नुसते आशाळभूत आहेत सारे !

तिथे कोपऱ्यात त्याची बहीण केविलवाणा चेहरा करून बसली होती. तिला पाहताच वीरेन्द्र किंचित शांत झाला.

माझ्या लाडक्या धुरूसाठी तरी मी घर सोडता कामा नये. आता ही तेरा-चौदा वर्षांची झाली. हिची आता शादी करायला हवी. तिलाच आधी अंगभर कपडे घ्यावेत. भांडवल आणि धंद्याचे पुढे पाहता येईल.

वीरेन्द्राचा तळहात अजून पाऊसधारेखाली होता. त्याच्या हातावर कारंजे थुईथुई करीत होते.

पावसाचा जोर अद्याप कमी झाला नव्हता. किती बरसतो आहे कोण जाणे ! पाण्याचा साठा आहे तरी किती, हे एक केदारनाथच जाणे !

★

## दोन

दुपारचे चार वाजले होते तरी काळ्याकुट्ट ढगांमुळे आणि कोसळणाऱ्या पावसामुळे खूप अंधारून आले होते. भोवतालचा हिमालय त्या धूसर प्रकाशात भीतिदायक, भयाण, अजस्र वाटत होता. पुढे पुढे तर इतके अंधारले, की पाऊसधाराही दिसेनाशा झाल्या. फक्त पाऊस असल्याची जाणीव होत होती.

काळ्या कापसाच्या गासड्याच जणू भसाभस कोसळत होत्या. पाऊस किंचित कमी झाल्यासारखा वाटला की कोंडून बसलेली माणसे झटकन इकडून तिकडे जात होती, पहिल्या आसऱ्याच्या जागेपेक्षा दुसरा बरा आडोसा शोधायचा प्रयत्न करीत होती. रस्त्यावर चिखलपाण्याचा रबरबाट झाला होता त्यात रपारप पावले लडबडत होती.

माणसे अगदी हवालदिल झाली होती. इथे परक्या ठिकाणी आपण पांथस्थ आहोत. हा पाऊस असाच कोसळत राहिला तर निवारा शोधायचा कुठे ? जेवण्या-खाण्याची व्यवस्था कुठे आणि कशी करायची ? घोड्यांना दाणा-पाणी कुठून मिळणार ? सर्वांच्या पुढे हे यक्षप्रश्न उभे ठाकले होते.

काही 'कुलीं'जवळ अंगावरील वस्त्र आणि एखादी घोंगडी, तीसुद्धा असली असली नसली नसली, अशी परिस्थिती होती. हे अंगावरचे कपडे भिजून चिंब झाल्यावर दुसरे घालायचे काय,

हाही प्रश्न काही लहानसहान नव्हता.

आता गौरीकुंडापर्यंत मोटाररस्ता झाला आहे. तेव्हा त्या 'कुलीं'ची, घोडेवाल्यांची गर्दी सोनप्रयागला होण्याचे कारण नव्हते. पण सोनप्रयाग ते गौरीकुंड दरम्यानचा रस्ता दोन ठिकाणी जरा धोकादायक झाल्याने जड वाहनांना बंद केला होता.

त्यामुळे यात्रेकरूंना सोनप्रयागपासूनच केदारनाथला जाण्याची सोय करणे भाग होते. डोली, कंडी अगर घोडा करायचा असेल त्याने सोनप्रयागपासून ते करणे भाग होते.

सोनप्रयागला पावसात सापडलेली ही व्यावसायिक मंडळी गुप्त काशीहून येणाऱ्या प्रवासी बसेसची वाट पाहत होती. सायंकाळचे पाच वाजले तरी एकही प्रवासी बस गुप्त काशीहून आली नव्हती. गुप्त काशी ते सोनप्रयाग हा रस्ताही नादुरुस्त झाला आहे की काय, अशी धास्ती त्यांना वाटत होती.

प्रवासीच आले नाहीत तर बद्रिकेदारला नेणार कुणाला ?

प्रवासीच नसले तर मिळकत कशी होणार ?

पैशांशिवाय जेवायला कोण घालणार ?

आणि जेवणच नाही मिळाले तर दुसऱ्या दिवशी प्रवासी वाहून नेण्याची ताकत कशी राहणार ?

प्रश्नांची साखळी निर्माण झाली होती. पहिला प्रश्न सुटला म्हणून बाकीचे प्रश्न सुटणार नव्हते.

वीरेन्द्र अद्याप पावसाचे तुषार झेलीत बसला होता. त्याचे कपडे भिजून चिंब झाले होते. त्याला थंडीने हुडहुडी भरली होती. त्याला चहा प्यावासा वाटत होता, पण खिशात दमडासुद्धा नव्हता. आणि समजा, खिशात पैसे असते, तरी चहावाला त्याच्यापर्यंत यायला हवा ना! तो समोरच्या टपरीत चहा

प्यायला जाईल तर ह्या पावसाने त्या टपरीची अक्षरशः चाळण झाली होती. छपरातून अनंत धारा आत येत होत्या. मालकाला चहाचे सर्व साहित्य तेथे टाकून दुसरीकडे निवाऱ्याला जाताही येत नव्हते. तो आपले पाय आपल्याच मिठीत घेऊन खुरमटून बसला होता.

पहाडी मुलखात राहणाऱ्या वीरेन्द्राला अशा पावसाचा सराव होता; पण हा अवेळी आलेला पाऊस त्याच्या रोजगारावर परिणाम करणार होता म्हणून त्याला खंत वाटत होती.

घर-दार, आपली माणसे सोडून इतक्या लांब आल्याचा तसा काहीच फायदा होणार नव्हता, म्हणून तो जरा चिडला होता. पावसाने आता आपला पसारा थोडा आवरता घेतलेला दिसत होता. जनावरे आपली कातडी थरथरवून अंगावरचे पाणी झटकून टाकत होती. आपल्या शेपट्या अंगावर फिरवून ऊब निर्माण करीत होती.

लाकडाच्या फळ्या जोडून तयार केलेले ते वूड हाऊस रेस्ट-रूम म्हणून प्रवाशांना दिले जायचे. त्याच्याच आडोशाला वीरेन्द्र बसला होता. रेस्ट-रूमचे दार किंचित किलकिले झाले व त्या दारातून सहा-सात वर्षांचा मुलगा हळूच बाहेर डोकावला.

तो गरम कपड्यांनी नखशिखान्त मढला होता.

तो आपल्या आजीला म्हणाला, ' दादीजी, बाहेर एक मुलगा बसला आहे. बिचारा खूप भिजला आहे आणि थंडीनं कुडकुडतो आहे. '

डोक्यावर पदर घेतलेले व केस पिकलेले डोके दाराबाहेर डोकावले.

दादीजी म्हणाल्या, ' ए छोकरा, इधर आव. '

वीरेन्द्र गारठलेले शरीर ताठ करून पायरीजवळ आला.

दादीजी म्हणाल्या, 'अंगावरचे कपडे काढ आणि हे कोरडं धोतर गुंडाळून घे आणि आत ये.'

वीरेन्द्र क्षणभर चक्रावला.

'माझी कीव करणारी ही अम्मा कोण ?'

पण ह्या क्षणाला जास्ती विचार करण्यात अर्थ नव्हता. थंडीने सारे अंग थरथरत होते. वीरेन्द्राने ते धोतर दुहेरी करून लुंगी-सारखे गुंडाळले आणि आपला शर्ट व पायजमा पिळला.

छोटा टिनू म्हणाला, 'ए, तुझा शर्ट दोन रंगांचा कसा ? तू शर्टला अस्तर लावलं आहेस का ?'

वीरेन्द्र किंचित हसला आणि म्हणाला, 'माझे हे दोन्ही शर्ट फाटके आहेत. माझ्या आईनं ते दोन एकमेकांना शिवून टाकले आहेत. थंडीसाठी जाड कपडा झाला आणि दोन्ही शर्टांचे फाटके भाग एकमेकांमुळे झाकले गेले.'

टिनूची बा म्हणाली, 'बघ टिनू, तू नवेच्या नवे कपडे आवडले नाही म्हणून फेकून देतोस. गरिबीची काही कल्पना आहे का तुला ?'

दादीजींनी वीरेन्द्राला आत बोलावले. स्टोव्हवर चहा उकळत होता. त्याचा सुवास खोलीत भरून राहिला होता. वीरेन्द्राचे त्या वासाने अगदी समाधान झाले. मऊ, कोरडे वस्त्र मिळाले, खोलीची ऊब मिळाली आणि शिवाय मसाला घातलेला चहा मिळाला. त्याला अगदी धन्य धन्य वाटले.

टिनूच्या पपांनी त्याची चौकशी केली... तो कोण ? कुठला ? तो कुली आहे कळताच त्यांनी केदारनाथाची हकीगत विचारली व वरपर्यंत जाण्याच्या सोयी विचारल्या.

तो म्हणाला, ‘ येथून मंदिर अठरा किलोमीटर आहे; पण रस्ता फार बिकट आहे. तुम्ही आणि माताजी घोड्यावरून जाऊ शकाल.’

दादीजींसाठी ‘ दंडी ’ म्हणजे डोली करायला हवी.’

पपा म्हणाले, ‘ आणि टिनूसाठी ?’

‘ तो काय, घोड्यावरून येऊ शकेल, पण त्याला त्याचा त्रास होईल. मांड्या आणि पाठ भरून येईल. त्यापेक्षा त्याला ‘ कंडी ’ करावी. जर सकाळी सहा वाजता येथून निघालो तर सायंकाळ पर्यंत केदारनाथला पोहोचू.’

पपा म्हणाले, ‘ मग तू आमची सर्व व्यवस्था बघशील का ? आम्हाला एक दंडी, एक कंडी आणि दोन घोडी बघावी लागतील.’

वीरेन्द्र आनंदून म्हणाला, ‘ हां, हां. क्यों नहीं ?’

पपा म्हणाले, ‘ खरं म्हणजे गौरीकुंडापर्यंत मोटारी जातात असं आम्हाला कळल्यामुळे आम्ही गौरीकुंडाचं रेस्ट-हाऊस रिझर्व केलं व आज मुक्कामाला तिथं जाणार होतो, पण ह्या पावसानं घोटाळा केला आणि इथं मुक्काम करावा लागला.’

दादीजी म्हणाल्या ‘ अरे मुला, थोडा नाष्टा करतोस का ?’

आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन, अशी वीरेन्द्राची अवस्था झाली. मघाशी प्यायलेल्या चहामुळे क्षणभर तरतरी आली पण भूक शमली नाही.

एका कागदावर चार-पाच तिखट पुऱ्या, लाडूचे दोन तुकडे आणि बचकभर फरसाण त्याला दिलं.

त्याने तृप्तीची ढेकर दिली व ग्लासभर पाणी प्यायला.

दादींच्या रूपात त्याला त्याची जणू आजी दिसत होती.

ती नेहमी म्हणते, ‘ बेटा, आपण आपलं काम करत राहावं. काळजी करू नये.

अरे, प्रयत्न आपल्या हातात असतो. काळजी निवारण करण्याचं काम केदारनाथाचं आहे.’

वीरेन्द्रानं तिथून न दिसणाऱ्या बद्रिकेदार शिखराकडे पाहून हात जोडले आणि म्हणाला, ‘ जय केदारनाथ ! ’

★

## तीन

त्रिजुगी नारायणाच्या बाजूने सोनगंगा खळाळून वेगाने येत होती आणि मंदाकिनी बद्रिकेदारकडून उत्साह उरी घेऊन वेगवान होऊन येत होती.

दोघींची उगमस्थाने भिन्न, पण त्यांच्या मार्गातल्या अडचणी मात्र सारख्या होत्या. डोंगर-कपाऱ्या, दगड-गोटे, बांध-बंधारे, प्रचंड शिळा इत्यादी अनंत अडथळे पार करीत शर्यतीत उतरल्या-प्रमाणे ह्या भगिनी आपला पिता हिमालय ह्याच्या अंगाखांद्या-वरून धावत होत्या— संकटाशी मुकाबला करून त्यावर मात करीत होत्या.

त्यांच्या प्रयत्नांना पराजय माहीत नव्हता. उलट, संकटाला दुप्पट दमाने त्या सामोऱ्या जात होत्या.

सोनप्रयागला त्या दोघी भगिनींचे मीलन झाले आणि त्यांचे बाल्य संपले. किशोरवयातला अमाप उत्साह, सर्वस्व समर्पणाची मानसिक तयारी, उत्स्फूर्त आनंद आणि हिरिरीने एकरूप होण्याची तयारी, इत्यादी गुणविशेष प्रकर्षाने जाणवत होते.

इथे सोनगंगा मंदाकिनीत स्वखुषीने विलीन झाली होती. तिने मंदाकिनीत स्वत:ला झोकून दिले होते आणि स्वत: नामशेष झाली. पण ह्या नामशेष होण्यात तिला कृतकृत्यता वाटत होती. थोरल्या भगिनीवरच्या निन्तात विश्वासाचे ते द्योतक होते. येथून

पुढे ती वाहिनी फक्त मंदाकिनी म्हणूनच ओळखली जाते.

हा विलीनबिंदू सोनप्रयागच्या रूपाने नावारूपाला आला. प्रयाग म्हणजे संगम. प्रयाग म्हणजे मीलन. असे कितीतरी प्रयाग हिमालयात आहेत.

किशोरवयातल्या वीरेन्द्राच्या मनात दोन परस्परविरुद्ध विचारांचे मीलन झाले ते त्याचे त्यालासुद्धा कळले नाही. ह्याचेच नाव किशोरवय, वेडे वय.

आपल्या आई-वडिलांवर व कराव्या लागणाऱ्या कष्टांवर थोड्या वेळापूर्वी चिडलेला वीरेन्द्र ह्या नव्या मंडळींनी दाखविलेल्या आत्मीयतेने पूर्ण भारावून गेला आणि त्याला आजीचे शब्द वारंवार प्रतिध्वनित होऊन ऐकू येऊ लागले... 'आपण आपलं प्राप्त कर्तव्य करावं. काळजी करू नये. तो गौरीशंकर कोणाच्याही रूपानं आपली काळजी निवारण करतो. ज्यानं जन्माला घातलं त्याला काळजी असते. आपण फक्त श्रद्धा ठेवायला हवी.'

जाडेभरडे सुती पातळ नेसलेली, पांढरेशुभ्र केस झालेली, किंचित बटबटीत डोळ्यांची व नाकात 'बुलाखी' घातलेली आजी त्याला सारखी स्मरत होती.

वीरेन्द्राला रात्रभर सोनगंगा–मंदाकिनी ह्यांच्या होणाऱ्या संगमाचा खळखळाट अनोखा आनंद देऊन जात होता.

पेव फुटल्याप्रमाणे अडकलेल्या प्रवासी बसेस सोनप्रयागला काल सायंकाळी येऊन थडकल्या. त्यामुळे शांत वाटणारे हे स्थळ गजबजून गेले. दाटी, गडबड, गिचडी, गोंधळ ह्यांचे जणू साम्राज्य पसरले. कालच्या पावसामुळे सारा परिसर चिखलमय झाला होता.त्यामुळे आणि अतोनात गर्दीमुळे तिथे एक प्रकारचे ओंगळ वातावरण कोंदले होते.

सकाळ झाली तरी वीरेन्द्राने काढून ठेवलेले कपडे ओलेच होते. ते त्याने तसेच अंगावर चढविले. आता सूर्यप्रकाशात ते अंगावर सहज वाळतील ही त्याला पुरेपूर खात्री होती.

दंडी, कंडी आणि घोडे ह्यांची चोख व्यवस्था त्याने केली आणि तो वूड हाऊसजवळ आला.

वेताच्या खुर्चीसारखी असलेली कंडी त्याने पाठीवर बांधली आणि त्याने त्यात टिनूला बसायला सांगितले. टिनू मोठ्या मजेने त्यात बसला. टिनू आणि वीरेन्द्र ह्यांच्या पाठी एकमेकांना चिकटल्या आणि त्यांची तोंडे विरुद्ध दिशेला झाली.

'जय केदारनाथ !' म्हणून वीरेन्द्र उठून उभा राहिला, तेव्हा मात्र टिनू किंचित गडबडला. त्याला अधांतरी बसल्यासारखे झाले. मी पडेन की काय, अशी त्याला भीती वाटली.



सोनगंगेच्या पुलावरून आगेकूच सुरू झाली. आधी दादीची

दंडी, त्यापाठोपाठ टिनूची कंडी आणि त्याच्या मागे 'बा' आणि पपांची घोडी.

घोड्यावर बसताना बा प्रथम घाबरल्या होत्या व घोडा चालायला लागल्यावर त्या थरारल्या, पण त्यांच्याप्रमाणे अनेक घोड्यांवर स्वार झालेले पाहून त्यांना जरा धीर वाटला. एखादा मोठा काफिला निघावा तसा सारा जनसमुदाय गौरीकुंडाच्या रोखाने निघाला.

वीरेन्द्रांच्या चालीबरोबर हलणाऱ्या कंडीमुळे टिनूला डुलणाऱ्या खुर्चीत बसल्यासारखे वाटत होते. एक-दोन कि. मी. अंतर पार केल्यावर सर्वांना आपआपल्या वाहनांची सवय झाली. घोड्यावर बसताना, कंडीत बसताना अगर दंडीत बसल्यावर ती उचलताना होणारा प्रवासी मंडळींचा आरडाओरडा, 'ओय ओय !', 'बाप रे बाप !', 'मरी गयो', 'नको, नको !' वगैरे उद्गार थांबले व ती मंडळी एकमेकांना 'जय केदारनाथ' म्हणून साद घालू लागली.

कालच्या पावसामुळे रस्ता जास्त बोचरा झाला होता. त्यावर असलेली खडी, दगड, वाळू जास्त अणकुचीदार होऊन जिव्हारी टोचत होती. डोंगरकपारीच्या आडोशाने उंच-सखल भाग पार करता करता अनन्वित कष्ट पडत होते.

चढ आला की वीरेन्द्र खाली वाकून गुडघ्यांवर हात ठेवून हळूहळू पावले टाकायचा. वीरेन्द्र खाली वाकला की टिनूचे तोंड आकाशाकडे व्हायचे. सकाळच्या थंड आणि शांत वेळी आकाशाची गहरी निळाई अप्रतिम दिसत होती.

त्या आकाशदर्शनाने टिनू अगदी खूष झाला होता. असा सुंदर

सुहावना रंग त्याने कधी पाहिलाच नव्हता. तो अधूनमधून वीरेन्द्राला विचारीत होता, 'भय्या, तुम थके तो नहीं ?'

टिनूच्या तोंडून 'भय्या' हे संबोधन ऐकले की वीरेन्द्र मोहरून जायचा. एवढ्या श्रीमंताचा मुलगा आणि माझ्यासारख्या सामान्य कुलीला भय्या म्हणतो ? एकदा खणखणीत पैसे ठरविल्यावर माझ्या थकावटीची चिंता करतो ? आश्चर्य आहे. इतर प्रवासी जीवघेण्या चढावर जर त्यांना म्हटलं की 'थोडं खाली उतरता का ?' तरी ते आमच्यावर डाफरतात आणि म्हणतात, 'क्यों भाई, हमारा पैसा हराम का है क्या ? तुला पैसे दिल्यावर आम्ही चालायचं कशासाठी ?'

माणसे विचारच करीत नाहीत, की माणसाचे ओझे माणूस वाहतो आहे. त्यालाही शरीरधर्म आहे. ऊर फुटेपर्यंत श्वास कोंडणे, घामाच्या धारा लागणे, पायांचे तुकडे पडतील काय, असे वाटणे हे सारे कुलीला होऊ शकते.

पैसे मोजले असले तरी त्याला सहकार्य द्यायला हवे. अवघड चढाच्या ठिकाणी थोडे पायउतार व्हायला हवे याची ते जाणीवच ठेवीत नाहीत.

जिथे घोड्यांच्या तोंडाला फेस येतो तिथे कुलींची काय अवस्था होत असेल ? पण आमचे पोट पाठीशी लागले आहे ना ? कुली, मग ते दंडी उचलणारे असोत, कंडी वाहणारे असोत, घोड्याचा लगाम धरून चालणारे असोत की सामानाचे बोजे उचलणारे असोत-- साऱ्यांची जीवनकहाणी एकच.

ठिगळावर ठिगळ लावून, चिंधीला चिंधी लावून अंग झाकायचे, डोके उघडे, अनवाणी पाय ह्यांनी ती काटेरी भूमी तुडवायची, उपाशी पोटी मणामणाची ओझी वाहायची, हेच ते जीवन.

हिमालय म्हणजे भारताचा मानबिंदू– भारताची संरक्षक भिंत. इथली समृद्धी, वैभव, गौरव– सारेच काही कुबेराहून संपन्न. पण इथला माणूस मात्र दारिद्र्याची परिसीमा भोगणारा. किती ही घोर परस्पर विसंगती !

टेहरी, गडपीली, नेपाळी, पहाडी– सर्वांची जीवनकथा एकच, ती म्हणजे दारिद्र्य ! कमालीचे दारिद्र्य !

★

## चार

'भय्या, अभी गौरीकुंड कितना दूर है?' कंडीत बसून कंटाळलेल्या टिनूने विचारले.

'देखो, यह 'मुंडकटा गणेश' आ गया. बस, अब गौरीकुंड नजीक आ गया है.' त्याला धीर देत वीरेन्द्र म्हणाला.

आता सूर्य बराच वर आला होता त्यामुळे उन्हं वाढायला सुरुवात झाली होती. आकाशाची निळाई संपून त्यावर चांदीचा मुलामा चढत होता; पण तो झगझगाट डोळ्यांना असह्य वाटत होता. एका बाजूने डोंगरकडे इतके उंच आणि भयाण होते, की ते केव्हा अंगावर झेप घेतील त्याचा नेम नव्हता. त्यामुळे कंडीत जवळजवळ उताणा बसलेला छोटा टिनू घाबरून गेला होता. परत चाललेली माणसे जाणाऱ्यांना 'जय केदारनाथ!' म्हणून सलामी देत होते. मधूनच पाठीवर सामान लादलेला मेंढ्यांचा कळप जात होता. कंडीवाले, दंडीवाले, घोडेवाले एकमेकांना इशारे देत होते:

'पहाड के बाजू होशियार... दंडी आ रही है' वगैरे वगैरे. त्यामुळे तशी थोडी करमणूक होत होती.

डोलीत बसलेल्या दादीजी पण अवघडल्या होत्या. घोड्यावर बसण्याची सवय नसलेले 'बा' आणि 'पपा'ही कंटाळले होते. घोड्याच्या खोगिराने त्यांच्या मांड्या हुळहुळ्या झाल्या होत्या व

घोड्यावर ताठ बसून पाठीचा मणका दुखू लागला होता. शेवटी एकदाचे गौरीकुंड आले. गरम पाण्याच्या कुंडावर प्रवासी स्नानाला गेले. इथे थोडा चहापाणी आणि नाष्टा करून मग आगेकूच करायची होती.

कुली मंडळी सावलीला विसावली. डोक्यावरचा सामानाचा बोजा, खांद्यावरचा दंडीचा भार आणि कंडीतला पाठीवरचा बोजा उतरल्याने त्यांना थोडी विश्रांती मिळाली. कुणी विडी शिलगावली तर कुणी जवळचा सुई-दोरा घेऊन फाटलेला कपडा शिवत बसले. कुणी आपले गप्पांत मग्न झाले.

एवढ्यात टिनू खाण्याचा पुडा घेऊन वीरेन्द्रकडे आला व म्हणाला, 'भय्या, यह लो. तुम भी खाओ.'

त्याबरोबर दंडी उचलून आणणारे चौघेजण आणि घोडी धरून आणणारे दोघेजण असे सहाजण पुढे आले आणि त्यांनी टिनूपुढे हात पसरले. टिनू बावरला. मागून येणाऱ्या पपांनी सर्वांच्या हातावर एकेक रुपाया ठेवला आणि म्हणाले, 'जाओ, चायपानी करो.'

तिथे उभा असलेला यात्रेकरू म्हणाला, 'अजून आपल्याला दोन-चार ठिकाणी थांबावं लागणार आहे. प्रत्येक ठिकाणी ही माणसं हात पसरतील. कारण त्यांना तशी सवयच आहे.'

दंडीमधून उतरलेल्या एक बाई म्हणाल्या, 'अहो, सरकारी रेटप्रमाणे आपण ह्या लोकांना एवढं भाडं दिलेलं आहे– मग शिवाय ही चिरीमिरी काय म्हणून द्यायची ? त्या लोकांनी माझ्या-जवळ पैसे मागितले तर मी आत्ता देईन, पण मग त्यांच्या भाड्याच्या रकमेतून कापून घेईन.'

कुलींचा चेहरा उतरला, पण बोलणार काय ? ती बाई

व्यवहाराच्या पातळीवर बरोबर बोलत होती.

दादी माँ टिनूच्या पपांना गुजराथीत म्हणाल्या,

'कोईने खावा आपेला पैसा पाछा लेवा ना नथी.'

(कुणाला खाण्यासाठी दिलेले पैसे परत घ्यायचे नाहीत.)

गरम पाण्याचे स्नान आणि थोडा-बहुत केलेला फराळ ह्यांमुळे प्रवासी ताजेतवाने झाले होते. आता टळटळीत उन्हात प्रवास होणार होता. आता पुढचा मार्ग जरा जास्त चिंचोळा होता. जर आमोरासमोरून दोन दंडचा आल्या तर पहाडाच्या बाजूच्या दंडीला पहाडाला लगटून उभे राहावे लागत होते. दरीकडच्या दंडीला थोडे तिरके होऊन जपून पुढे सरकावे लागत होते. दंडीवाले चौघे अगदी सराईत, कसलेले असल्याने ते शिताफीने तिरके होत, पण दंडीत बसलेल्यांची मात्र भीतीने घाबरगुंडी उडत असे.

एका बाजूला हिमालयाचे अजस्र भयाण सुळके, दुसरीकडे डोळे फिरवणारी खोल दरी. दरीच्या पलीकडे पुन्हा उंच उंच पर्वतरांगा होत्या. ह्या दरीतून मंदाकिनी नदी अव्याहत वाहत होती. जणू ती प्रवासी लोकांना सोबत करीत होती.

कित्येक ठिकाणी पर्वतउतार ओरबाडल्यासारखा दिसत होता. त्या ठिकाणी रेताड पट्टा पडलेला दिसायचा.

वीरेन्द्र सांगत होता, 'ह्या पर्वतदरडी कोसळलेल्या खुणा आहेत. माथ्यावरच्या प्रचंड शिळा पर्वताला ओरबाडत ओरबाडत घरंगळून दरीत पडतात.'

आता ऊन चांगलेच तापले होते. उघडाबोडका हिमालय जास्तच भयाण वाटत होता, आणि आता जर दरड कोसळली तर, ह्या कल्पनेने काही प्रवासी भेदरले होते.

गंधकाच्या पाण्याने झालेले स्नान, लागणारे ऊन आणि केलेला फराळ ह्यामुळे दादीजींना आणि टिनूला मळमळू लागले.

दादीजी म्हणाल्या,'ह्या डोलीत सारखं झोके घेतल्यासारखं होतं. त्यामुळे जास्तच मळमळतं आहे. मी आपली थोडी अधूनमधून चालते व मग दंडीत बसते.'

मग टिनू आणि दादीजी पायी चालू लागायचे.

पायी चालणारेसुद्धा बरेच प्रवासी होते. कित्येक स्त्रिया तर एकवस्त्रा होत्या. त्यांच्या अंगात चोळी-पोलकेसुद्धा नव्हते व शिवाय डोक्यावर सामानाची बाचकी होती. पण त्यांची श्रद्धा, केदार-नाथाच्या दर्शनाची उत्सुकता मात्र विलक्षण होती. वाहन करणे आर्थिकदृष्टचा परवडणारे नव्हते; पण त्या पायी चालून आपली मनोकामना पूर्ण करीत होत्या. त्यात काही मुले होती, म्हातारी माणसे होती. काही पंगूही होती.

टिनू म्हणाला, ' वीरेन्द्रभय्या, ही सर्व माणसं पायी पायी वर जाणार ?'

दादी म्हणाल्या, ' पहा ना. आणि आम्हाला आमचा देह उचलणं जड झालं आहे.'

एक आजोबा काठीचा आधार घेत घेत खांद्यावरची पडशी सावरीत सावरीत धीमी पावले टाकीत मार्ग संपवीत होते. त्यांनी ह्यांचे बोलणे ऐकले.

ते म्हणाले, ' देह तर आम्हालाही जड होतो. पण पैसे नसले तर कंडी-दंडीला कुठून भरायचे ? पण तुम्ही पहा, ह्या इतर वाहनांपेक्षा पादचारीच लोक जास्त आहेत. अहो, श्रद्धा असेल तर बद्रिकेदार हे बळ देतो. पायी जाणारी माणसं गौरीकुंड आणि रामपाड्याला मुक्काम करतात व मग तिसऱ्या दिवशी केदार-

नाथला पोहोचतात.'

बराच चढ चढून झाला होता. दादीजींच्या पायांतून पेटके येऊ लागले व टिनूच्या पोटऱ्या टणक झाल्या म्हणून दोघेजण आपआपल्या वाहनात बसले.

पाठीला लहान पोरे बांधून चाललेल्या बायका, डोक्यावर बोजे घेतलेले पुरुष, थोडया थोडया अंतरावर सावलीला विसावणारी मुले असीम श्रध्देने समोर आलेल्या प्रवाशांना ' जय केदारनाथ ! ' म्हणत होती. उतरणाऱ्या प्रवाशांना विचारत होती, अजून किती चढावं लागणार आहे ? मंदिर कितनी दूरी पर है ?'

दंडीत बसल्या बसल्या दादीजी त्या कुलींशी सुखसंवाद साधीत होत्या.

' मुलांनो, तुमची अगदी कमाल आहे हं ! ह्या इतक्या अवघड चढणी खांद्यावर ओझं घेऊन तुम्ही कसे रे चढता ? तुमचे पाय म्हणजे लोखंडाच्या कांबी आहेत की काय ? आणि दंडीचा दांडा सावरणारे तुमचे खांदे पोलादाचेच म्हटले पाहिजेत ! धन्य आहे तुमची ! इतकं बळ कुठून येतं रे ?'

मोहनसिंग खांदा बदलीत म्हणाला, ' दादीजी, आमचं पोट आम्हाला हे बळ देतं बरं. दादीजी, आम्ही केदारनाथहून वापस सोनप्रयागला गेल्याबरोबर जर आम्हाला लगेच प्रवासी मिळाले तर आम्ही त्याच पावली पुन्हा केदारनाथाकडे कूच करतो.'

दादी म्हणाल्या, ' बाप रे ! आता मात्र खरंच कमाल म्हटली पाहिजे ! काय रे, तुम्ही चौघेजण विशीच्या आतली मुलं दिसता. अरे, तुमच्याएवढी आमची मुलं साधा पाण्याचा तांब्यासुद्धा भरून घेत नाहीत आणि तुमच्या कपाळी काय हे राक्षसी कष्ट !'

श्यामसिंग म्हणाला, ' हा मोहनसिंग तर केवळ पंधराच वर्षांचा

आहे. ह्या यात्रेच्या वेळी आम्ही आमची घरंदारं सोडून इथं येतो. उघड्यावर राहतो आणि मिळेल ते खातो. पण आता आमच्या-सारखे बरेच कुली यायला लागल्यामुळे आता सर्वांनाच काम मिळतं असं नाही. त्यामुळे कष्ट करायची तयारी असून कामच नसतं, अशी आमची परिस्थिती होते.'

बा आणि पपा रामपाड्याला येऊन पोहोचले होते. पपांनी तिथल्या झोपडीतल्या हॉटेलमध्ये दहा-बारा कप चहाची ऑर्डर दिली. बांना मात्र आता उभं राहणंदेखील अशक्य होतं.

त्या म्हणाल्या, 'माझा पाठीचा मणका आणि मांड्या असह्य ठणकत आहेत. मी थोडी विश्रांती घेतल्याखेरीज पुढं येणार नाही.'

झोपडीच्या आत एका बाजूला जमिनीवर त्या आडव्या झाल्या. शेवरीच्या मऊ मऊ गादीवर झोपणारी ही श्रीमंत बाई, पण आज ओबडधोबड जमिनीवर विसावली होती. तो स्पर्श तिला सुखद वाटत होता.

पाठोपाठ दादीजींची दंडी आली आणि टिनूची कंडी पण आली. कुलींसह सर्वांनी चहा घेतला.

पपा म्हणाले, 'छे बुवा! घोड्यावर बसण्यापेक्षा चालत जाणं परवडलं! काय तो त्रास!'

दादीजी म्हणाल्या, 'असंच असतं बाबा. माणसाला जी स्थिती आहे ती नकोशी वाटते आणि दुसऱ्याची स्थिती हवीशी वाटते. अरे बाबा, पादचाऱ्यांचं दुःख, त्रास त्यांचा त्यांना माहीत. ते म्हणतात, घोड्यावर बसणारे सुखी.

घायल की गति घायल जाने और न जाने कोय ॥'

बांच्याच शेजारी दादीजी आणि टिनूही विसावले. इकडे पपा त्या लोकांकडून पहाडी लोकांचे जीवन, त्यांचे राहणीमान, त्यांची

उपजीविकेची साधने, इत्यादी गोष्टी ऐकत बसले होते.

वीरेन्द्र विडीचा झुरका घेत म्हणाला, ' आम्ही मंडळी पहाडी मुलुखातली. तेव्हा डोंगरउतरणीवर अगर पायथ्याशी आमची घरं आम्ही उभारतो. आम्हाला शेतीसाठी फार थोडी जमीन उपलब्ध असते. तीसुद्धा निकृष्ट असते. भुसभुशीत, खडकाळ, क्षारयुक्त. त्यावर येणारी पिकं आम्हाला वर्षभर पुरत नाहीत. आमची गुरंढोरं घेऊन आम्ही रानोमाळ हिंडतो.

पपा तिथे रवंथ करीत असलेल्या घोड्यांकडे पाहून म्हणाले, ' मग ही यात्रा नसेल तेव्हा ह्या जनावरांना कसं पोसता ?

एक प्रौढ घोडेवाला म्हणाला, ' शाब, हा सीझन संपला की शेवटच्या दिवशी आम्ही खास घोड्यांसाठी खिचडी रांधतो व त्याला श्रमभोजन म्हणून पोटभर खाऊ घालतो. मग त्याच्या पाठीवर खरारा करीत करीत त्याच्या कानांत सांगतो की, ' तुझं काम झालं आहे. तू खुशाल हवा तिथं जा. ' घोडा शहाण्यासारखा तिथून निघून दूर दूर पहाडात जातो. आणि जेव्हा सीझन सुरू होतो तेव्हा आम्ही जोरजोरात ढोल बडवितो. शाब, माणसापेक्षा जनावरांना जास्त ज्ञान असतं. हा ढोलाचा आवाज दऱ्याखोऱ्यांत घुमतो व आठ महिने परांगदा झालेली घोडी लगबगीने आप-आपल्या मालकांजवळ येऊन उभी राहतात.

ती इतक्या दिवस दऱ्याखोऱ्यात हिंडून आपलं पोट भरतात; पण ढोल वाजल्यावर ती अचूक परत येतात ही केदारनाथाची कृपा ! '

ही हकीगत ऐकून पपा आणि इतर प्रवासी मंडळी अवाक झाली.

कुणीतरी म्हणाले, ' ही जनावरं वफादार असतात. माणूस

क्षणोक्षणी कृतघ्न बनतो, पण बिचारी जनावरं कृतज्ञ असतात.'

तरुण कुलींकडे पाहत पपा म्हणाले, 'तुमच्यासारखी उमलणारी फुलं ही उपासमार का सहन करतात? आपला कोष फोडून ते बाहेर का येत नाहीत? अरे, जरा हा पहाडी मुलूख सोडा आणि इतर प्रांतांत जा.'

वीरेन्द्र म्हणाला, 'साहेब, लेकिन आम्ही अशिक्षित. आम्ही निर्धन. शिवाय परप्रांतात आमचं कुणी ओळखीचं नाही. आम्ही कुठल्या जोरावर आमचा मुलूख सोडायचा? आणि नेमकं जायचं कुठं?'

पपा म्हणाले, 'तारुण्याच्या उंबऱ्यावर उभी असलेली तुम्ही मुलं! अरे, असा नन्नाचा पाढा काय घोकता?

तुमचं निरोगी, काटक शरीर, अपार कष्ट करायची तयारी आणि धाडस– शिवाय मनाचा कणखरपणा हे गुणविशेष तुमच्याजवळ असताना हताश का होता?

ह्या गुणविशेषांना योग्य कार्यात कार्यान्वित करा.'

१८६७

## पाच

कुली मंडळी आता घाई करू लागली.

'पुढचा मार्ग फार अवघड आहे. आता निघायला हवं. नाही तर संध्याकाळपर्यंत आपण मुक्कामाला पोहोचणार नाही.'

थोडी विश्रांती झाली होती. पुढे जाण्याची ओढ होतीच. म्हणून प्रवासी मंडळी लगेच मार्गस्थ झाली.

रामपाडा मागे पडला.

'पपा, तो डावीकडचा डोंगर पहा. काय मस्त सीन आहे हो! अगदी सिनेमात दाखवतात तस्सा आहे!'

त्या डोंगरउतरणीवर एकाखाली एक असे तीन समांतर रस्ते होते. ते रस्ते प्रवासी मंडळींनी नुसते फुलून गेले होते. सगळ्यांत वरचा रस्ता तर जणू आकाशाशी गुजगोष्टी करीत होता. त्यावर चालणारी मनुष्यांची रांग एखाद्या जाड दोरासारखी वाटत होती.

ह्या पर्वताला जणू माणूसरूपी दोरांनी वेढे घातले होते असे दिसत होते.

कुणी राजामहाराजा आपला काफिला घेऊन मोठ्या रुबाबात चालला आहे असा भास होत होता.

टिनू म्हणाला, 'काय टॉप सीन आहे हा! भय्या, आपण ह्याच रस्त्यावरून जायचं आहे का?'

वीरेन्द्र पाठीवरची कंडी सावरीत व चढणीसाठी दमदार पावले टाकीत म्हणाला, 'हां. वहींसे जाना होगा. आपण वरच्या रांगेत सामील होऊ तेव्हा ही खालच्या रस्त्यावरची माणसं म्हणजे नुसत्या मुंगळ्यांच्या रांगा वाटतील. कारण एवढ्या उंचीवरून माणसांची फक्त काळी काळी डोकीच दिसतात. आहे की नाही मज्जा ?'

आता अगदी उभी चढण सुरू झाली. घोड्यावर बसून चढणे शक्यच नव्हते म्हणून पपा आणि बा पायउतार झाले. टिनू पण कंडीतून उतरला.

घोडेवाले रिकामे घोडे घेऊन पुढे निघून गेले. पपा, बा, टिनू आणि वीरेन्द्र एकमेकांचे हात धरीत चढू लागले.

दादीजींची दंडी अजून मागेच होती. पपा म्हणाले, 'मी जरा थांबतो. तुम्ही पुढं व्हा.'

बा म्हणाल्या, 'आपण सगळीच थांबू या.'

इतक्या उंचीवरून दूरवरची दरी विस्तीर्ण दिसत होती. मोठमोठे हिरवेगार वृक्ष जास्वंदीसारख्या लाल फुलांनी लगडले होते. खोलवर मंदाकिनी वेगात वाहत होती. पाठीशी उंचच उंच पर्वतभित होती.

भोवताली बरीच माणसे असली तरी ती अनोळखी, दमलेली आणि केदारनाथाची लय लागलेली होती.

निसर्गाचे हे भव्य रूप रमणीय होते. ह्या विशाल निसर्गापुढे माणूस किती थिटा आहे ह्याची वारंवार जाणीव होत होती. भल्या मोठ्या शिलाखंडांवर तिघेजण बसले. पाठीला कंडी बांधलेला वीरेन्द्र उभा होता.

पपा म्हणाले, 'वीरेन्द्र, आमच्याबरोबर आमच्या गावाला

येतोस ? तिथं माझं स्वतःच मोठ्ठं हॉटेल आहे.'

वीरेन्द्राचा प्रश्नांकित चेहरा पाहून ते म्हणाले,' मघाशी गौरी-कुंडावर तू म्हणालास, आम्ही अनपढ, आम्ही गरीब. आम्ही दुसरीकडे कसे जाणार ?'

म्हणून म्हणतो, चल, मी तुला बरोबर नेतो आणि नोकरी देतो. दोन टाईम जेवण, अंगभर कपडा, शिवाय पगार देईन. बघ, विचार कर आणि मग सांग.'

वीरेन्द्र म्हणाला, 'पण तुम्ही कोण, कुठले राहणारे, तुमचं हॉटेल कुठं आहे– वगैरे मला काहीच माहिती नाही. मग मी कसं आणि काय सांगणार ? माझी नानी नेहमी म्हणते की, अनोळखी माणसावर एकदम विश्वास ठेवू नये. प्रथम आपल्याला त्याच्या बोलण्याचा मोह पडतो पण मागाहून फसगत होते.'

पपा एकदम उठले आणि त्याचा खांदा थोपटत म्हणाले, 'बडा श्याना लडका है ! अरे, तुझी आजी म्हणते ते अगदी खरं आहे. पण असं बघ, कधी कधी अनोळखी माणसांवर विश्वास ठेवल्यानं काम सुकर पण होतं. आता काल संध्याकाळचंच उदाहरण घे. आम्ही तुला आमच्या रेस्ट-हाऊसमध्ये आसरा दिला, पण तू आमचा विश्वासघात केला नाहीस. जर तू रात्री आमचं सामान घेऊन गुपचूप पळून गेला असतात तर ?'

वीरेन्द्र चटकन म्हणाला, 'ना, ना ! चोरी करना पाप है. उपकारकर्त्याची चोरी करणं तर महापाप आहे. भूक लागली तर हात पसरून मागून घेईन पण चोरी करणार नाही.'

'मग मीसुद्धा तेच म्हणतो आहे, की अनजान माणूस प्रत्येक वेळी विश्वासघात करतोच असं नाही. उलट, तू तर आमच्या किती उपयोगी पडलास ! दंडी-कंडी-घोडे वगैरे बघण्याची,त्याच्या

ठरवाठरवीची व्यवस्था तूच केलीस. मला त्रास झाला नाही.'

वीरेन्द्राला पपांचे बोलणे पटत होते, पण त्यांच्याबरोबर अनोळखी मुलुखात जाण्याचे धाडस होत नव्हते. तो गुळमुळीत-पणे म्हणाला, 'माझे माँ-बाप तिकडे दूर पहाडात राहतात. त्यांची परवानगी काढायला हवी. त्याशिवाय मी कसा येणार ?'

पपा म्हणाले, 'मी तुला सांगतो ते नीट ऐक. आता ही यात्रा संपेपर्यंत तू इथं ह्या बद्रिकेदारच्या परिसरातच राहणार ना ? म्हणजे तू माँ-बापपासून दूरच राहणार आहेस.

उद्या आम्ही पहेलगामला परतू तेव्हा तू आमच्याबरोबर चल. ह्या यात्रेत जेवढे पैसे तुला मिळतात तेवढे मी तुला आधीच देऊन ठेवीन. समजा, तिथं गेल्यावर तुला नाही आवडलं, नाही पटलं तर तू परत येऊ शकतोस. मी काहीही सक्ती करणार नाही.'

वीरेन्द्राला ह्या साऱ्याच गोष्टी सुरस आणि चमत्कारिक वाटत होत्या. ह्या मंडळींना माझ्याबद्दल इतकी कळकळ का, ह्या प्रश्नाचा उलगडा होत नव्हता.

दंडी दृष्टिपथात आली होती. पपा म्हणाले, 'चला. तुम्ही चालू लागा. मी माझ्या आईचं बोट धरून हळूहळू येतो.'

टिनू, बा आणि वीरेन्द्र चालू लागले. बा त्याला म्हणाल्या, 'अरे मुला, हे सांगतात त्याचा नीट विचार कर. ह्यात तुझं कल्याण आहे. तू त्यांना मनापासून आवडलेला दिसतोस त्याशिवाय ते कुणालाही असं म्हणणार नाहीत.'

टिनू म्हणाला, 'भय्या, तू नाही म्हणू नकोस अरे, आमच्या घरी तुला खूप आवडेल. मी तुला लिहाय-वाचायला शिकवीन. शिवाय क्रिकेट, बॅडमिंटन पण शिकवीन.'

तो बालसुलभ बुद्धीनं म्हणाला.

वीरेन्द्राचे विचारचक्र सुरू झाले...

ह्या साहेबांवर विश्वास ठेवावा का ? आपली ही ढोरमेहनत कमी होईल का ? पण नव्या गावात, नव्या माणसांत, नव्या कामांत जम बसेल का ?...त्याला आपल्या माँची मूर्ती वारंवार दिसू लागली. कथलाचे कडे, कथलाच्या अंगठ्या आणि पायांत कथलाचेच तोडे घातलेली आई जरी ओबडधोबड असली तरी तिची माझ्या-वर फार माया आहे. गरिबीमुळे ती गांजून जाते व मला अद्वातद्वा बोलते; पण मी इकडे दूर यायला निघालो की तिच्या डोळ्यांत पाणी तरारते. बेटा, सम्हल के रहेना. खाने-पीने में कुछ कमती मत करना, वगैरे वारंवार बजावते.

तिला जर कळलं, की मी पैशाच्या मागं लागून परप्रांतात गेलो आहे तर तिला काय वाटेल ?

त्याच्या नजरेपुढे त्याची सानुली बहीण धुरू तरळली. तिची शादी करण्यासाठी पैसा हवाच. आपलं दारिद्र्य फिटायचं असेल तर धाडस करायला हवं.

इतकं कळकळीनं बोलणारे साहेब आपल्याला कशाला फस-वतील ?आणि फसविण्यासारखं आपल्याजवळ आहे तरी काय ? उलट, तेच आपल्याला दोन-चारशे रुपये आगाऊ देणार आहेत. आपल्याला तिथं नाही आवडलं तर परत येण्यास त्यांची काही हरकत नाहीये.

प्रवासी डोंगरमाथ्यावर आले होते. आता रस्ता सपाटीचा होता. सर्वांनी सुटकेचा श्वास टाकला.

मोगऱ्याच्या शुभ्र फुलांचा मऊ मऊ गालिचा अंथरावा तसा सर्वदूर बर्फाचा वर्षाव झालेला होता. रेस्ट-हाऊस अजून एक मैल अंतरावर होते. तिथपर्यंत ह्या बर्फाच्या पायघड्यांवरून जायचे

होते. काल सोनप्रयागला जेव्हा धुवांधार पाऊस पडत होतो तेव्हा इथे खूप बर्फ पडला होता म्हणून ही धवलशुभ्र बिछायत झाली झाली.

टिनू चटकन कंडीतून उतरला आणि बर्फावरून चालण्याचा हट्ट करू लागला. बा आणि पपा आधीच पायउतार झाले होते. सर्वांच्या पायांत गम-शू होते त्यामुळे पायांना बर्फाचा त्रास होणार नव्हता. हातांतल्या काठ्या टेकत टेकत, वर्फ उडवीत उडवीत मोठ्या मजेने इतर मंडळींबरोबर हे चालले होते.

सकाळपासून आलेला शीण वर्फदर्शनाने केव्हाच निघून गेला होता. दादी मात्र दंडीतून उतरल्या नाहीत.

दंडी थांवली, कंडी थांबली आणि घोडेसुद्धा थांबले.

पपा म्हणाले, ‘ आम्हाला रेस्ट-हाऊसमध्ये जायचं आहे. इथं का थांबलात ?’

रेस्ट-हाऊसचे फक्त छप्पर दिसत होते. बाकीचे रेस्ट-हाऊस वर्फात गाडले गेले होते.'ही मंडळी छपराच्या उंचीवर उभी होती. वीरेन्द्र तिकडें बोट करून म्हणाला, ‘ हे काय इथं रेस्ट-हाऊस. ’

तेवढ्यात व्यवस्थापक बर्फाच्या बोगद्यातून बाहेर आले आणि म्हणाले, ‘ इकडून दार मोकळं केलं आहे. ’

बाप रे ! ही तर शीतपेटी ! चहूबाजूंनी बर्फात गाडलेली ! आधीच थंडीने गारठलेली माणसे ह्या शीतपेटीत जायला धजेनात. मोहनसिंग म्हणाला,‘ शाब, अंदर जाव. आता जर गार वारं सुटलं तर इथं उभं राहणं अशक्य होईल.’

पपा आत आल्यावर व्यवस्थापकांना म्हणाले, ‘ आमच्याकडून हवा तो चार्ज घ्या, पण आधी कोळशाची शेगडी पेटवा. ’

‘ साहेब, इथं कोळसा शिल्लक नाही. थोडा-बहुत आहे तो पेटतो

का बघतो, पण ह्या गारठ्यामुळे पेटेलच असं नाही.'

थंडीने हात-पाय कायमचेच आखडतात की काय असे झाले. सेवकाने स्टोव्ह पेटविला व एका पातेल्यात बाहेरचा बर्फ भरून आणला आणि पातेले स्टोव्हवर ठेवले आणि म्हणाला,

'एक तासानं हा बर्फ नुसता वितळेल. मग हवं तर हात-पाय धुवा.'

आता मात्र फारच पंचाईत झाली. रेस्ट-हाऊसमधले अंथरूण-पांघरूण म्हणजे जणू बर्फशय्या होती. तीपासून ऊब मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. उंचीवर हवा विरळ झाल्याने श्वासोच्छ्वासाला अत्यंत त्रास होता. आता काय करायचे हा यक्ष प्रश्न उभा राहिला.

थोड्या वेळाने मंदिरात सायंआरती होणार होती. पण त्या जीवघेण्या थंडीत कसली आली आहे आरती आणि कुठला आला आहे देव ? डोळे उघडण्याचीसुद्धा ताकद राहिली नव्हती. पोटातून थंडी उड्या घेत होती.

वीरेन्द्र आत आला आणि म्हणाला, 'आप के पास ब्रिांडी है क्या ?'

जवळ असलेल्या ब्रँडीचे आता स्मरण झाले. स्टोव्हवरचे थोडे पाणी घेऊन त्यात ब्रँडी घालून सर्वांनी घोट घोट घेतली तेव्हा कुठे थोडा आराम वाटला.

'सगळे कुली बाहेर आहेत.त्यांची काय अवस्था झाली असेल ?'

नशिबाने कोळसे पेटले होते. सर्वजण एकाच खोलीत शेगडी-भोवती बसले व ऊब मिळवू लागले.

दादीजी सारख्या देवाचा धावा करीत होत्या—'भगवंता,इतक्या

अवघड ठिकाणी कुठं येऊन राहिला आहेस ? भक्तांची सत्त्व-परीक्षाच बघतो आहेस रे बाबा ! इथूनसुद्धा मंदिर चार फर्लांग आहे म्हणतात. कसं रे येणार तुझ्या दर्शनाला ? इथवर येऊन दर्शन न घेताच जावं लागणार का रे ? देवा, तुझी शांभवी आहे.' असं म्हणून त्यांनी ब्रँडीचा घोट घेतला.

★

## सहा

कुली शेकोटी करून त्याच्याभोवती बसले होते.

वीरेन्द्राच्या विचारचक्राला आता वेग आला होता.

'काय करावं? त्यांच्याबरोबर जाऊन आपल्या नशिबाची परीक्षा पाहावी का? हे मोहनसिंग, श्यामसिंग, रामसुभग माझ्याच गावचे आहेत आणि माझ्याच वयाचे आहेत. त्यांना ह्याबद्दल सल्ला विचारावा का?

श्यामसिंग म्हणाला, 'अरे पगले, सोचता क्या है? झट से हां भर दे.'

मोहनसिंग म्हणाला, 'अरे, तू औरतलोगसारखी चुडिया. भरली आहेस का? इतका घाबरतोस कशाला? जाऊन तर पहा. नाहीतर वापस ये. तू काही त्यांचा बांधील नाहीस.'

रामसुभगसिंग म्हणाला, 'संधी दार ठोठावते त्या वेळी आपण ते उघडलं पाहिजे. नाहीतर ती निघून जाते.'

मित्रांचा एकमुखाने होकाराचा सल्ला मिळताच त्याच्या मनाला दुजोरा मिळाला आणि ह्या आनंदाच्या भरात त्याने तिथे पडलेल्या रिकाम्या पत्र्याच्या डब्यावर ताल धरला. त्या तालावर बाकीची मंडळी टाळ्या वाजवू लागली. आजी म्हणत असलेले ढोलकीगीत याला आठवले....

'दुवार पै आये मेरे कौन मेहमान,
डमरू बजाये भसम लगाये, संकर भगवान।'

तो हे गीत सांगू लागला आणि बाकीची मंडळी त्याला साथ करू लागली. गीताची लय दुप्पट, तिप्पट, चौप्पट झाली. त्या लयीची, त्या ढोलकीच्या बोलांची आणि स्वरांची मस्ती चढली. थंडी कुठल्या कुठे पळून गेली होती.

निरभ्र आकाशातून चांदणे पाझरू लागले. चंदेरी मंदिल बांधून बसलेली पर्वतशिखरे चांदण्याच्या बरसातीने न्हाऊन निघाली. जिकडें-तिकडे गौरी-शंकराच्या निसर्गाचे विशाल वैभव मोहून टाकत होते. हे गीत आणि त्याची लय जणू त्या शिखरांनासुद्धा डोलायला लावीत होती. ते सूर जणू त्यांच्या रोमारोमांत भिनत होते.

'दुवार पै खडी देखो कौन लुगाई (स्त्री)।
महादेव से पारबती की हुई सगाई॥'

दुसरे ढोलकीगीत रंगू लागले. लय वाढू लागली, अंगात ऊब साचू लागली. सगळ्या श्रमांचा परिहार झाला. गाण्याचा जोष वाढत होता व ह्या बद्रिकेदारच्या परिसरात शंकर–पार्वतीचे लोकगीत रंगत होते.

रात्र केव्हा संपली हे ह्या किशोरांना समजलेच नाही. सकाळी शीतपेटीतून प्रवासी बाहेर पडले. बर्फ अजून पसरलेलेच होते, पण सूर्यकिरणांमुळे थंडी किंचित कमी भासत होती. सारा आसमंत ती सूर्यकिरणे परावर्तित करीत होता. त्यामुळे सगळीकडे झळाळी पसरली होती. क्वचित इंद्रधनुषी सप्तरंगाचे मनोज्ञ दर्शन घडत होते. निसर्गाबरोबर माणूसही आनंदाने न्हाऊन निघाला होता.

अंगावर गरम कपड्यांचे डगले चढवून, हातांत काठ्या घेऊन सर्वजण मंदिराकडे निघाले. सभोवार बर्फाच्छादित शिखरे, पायां-

खाली बर्फाच्या पायघड्या, सारे शांत वातावरण. त्यामुळे मनात पावित्र्य दाटून येत होते, श्रद्धा वृद्धिगत होत होती. गार वारे झोंबत असले तरी ते सुसह्य वाटत होते.

इतक्या मनस्वी थंडीतसुद्धा मंदाकिनीत– अक्षरश: बर्फनदीत काही श्रद्धावान स्त्री-पुरुष आंघोळ करीत होते.

दादीजी म्हणाल्या, 'पाहिलंत हे दृश्य ? एवढी जीवघेणी थंडी असून कोणती श्रद्धा त्यांना आंघोळ करायची ताकद देते ? सारंच विलक्षण, सारंच अगम्य आहे.'

बद्रिकेदार म्हणजे बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक. ह्या मंदिरात शिवलिंग म्हणजे खाबडखुबड खडकाचा उंचवटा आहे. कोपऱ्या-कोनाड्यात नंदादीप तेवत असतो. इथला सीझन संपला, बर्फ-वृष्टीला सुरुवात झाली की ह्या नंदादीपात तेल घालून त्याची ज्योत तेवत ठेवून पुजारीमंडळी हे स्थान सोडून पायथ्याशी मुक्कामाला जातात; व सहा महिन्यांनंतर हे मंदिर उघडले म्हणजे तो नंदादीप तसाच तेवत असलेला दिसतो. हे एक सृष्टीचे नवलच आहे.

मोठ्या भाविकपणे सर्वांनी ह्या परमेश्वराचे दर्शन घेतले. स्थानमाहात्म्याच्या बऱ्याच कथा पुजारी सांगत होते.

मंदिराच्या पाठीमागेच आद्य शंकराचार्यांचा मठ आहे. ह्या मंदिराच्या उत्तरेच्या बाजूला म्हणे ते मानससरोवर आहे.

सारा परिसर आल्हाददायक आणि मन भारावून टाकणारा होता. इथे आल्याचे कृतकृत्य वाटत होते. अजूनही सूर्यकिरणे इंद्रधनुष्ये निर्माण करीत होती.

परतीचा प्रवास वेगाने सुरू झाला. आता सगळा उताराचा मार्ग होता. दरीत कुठे कुठे सुरुंग उडत होते. त्यांचे कानठळ्या

बसविणारे आवाज त्या खोऱ्यात प्रतिध्वनित होत होते. सुरुंगाचा दणका ऐकला की प्रवासी मंडळी डोंगरकपारीच्या आडोशाला आधार घेत होती. न जाणो एखादा आकाशात उडालेला दगड कपाळमोक्ष करणारा ठरायचा. उठणारा धुराळा दरी व्यापून टाकीत होता. अधूनमधून वीरेन्द्राच्या मनातसुद्धा शंका-कुशंकेचा धुराळा उडत होता व त्याचे चटकन निरसनही होत होते. परतीच्या वाटेवर श्यामसिंग, मोहनसिंग, रामसुभग ह्यांच्या ह्याच विषयावर गप्पा, सल्ला-मसलती चालल्या होत्या.

'तुझा तिकडे जम बसला की आम्हाला कळव.'

'ही ढोरमेहनत सोडून आम्हीसुद्धा तिकडे येऊ.'

'तू काही काळजी करू नकोस. आम्ही तुझ्या घरी सारं काही समजावून सांगू. तू मात्र वारंवार चिठ्ठी पाठवीत जा.'

मंडळी मजल-दरमजल करीत सोनप्रयागला येऊन पोहोचली. वीरेन्द्राला मोटारवर पोहोचवायला सारी कुली मंडळी गोळा झाली होती. कुणी त्याच्या भाग्याचा हेवा करीत होते, कुणी त्याच्या धाडसाचे कौतुक.

सर्वांच्या मनात त्याच्याबद्दल सदिच्छा होत्या. आपले फाटके आणि मळके कपडे घालून ह्या मंडळींबरोबर प्रवास करायचे त्याच्या जिवावर आले होते, पण त्याला इलाज नव्हता. पैसे हातात आल्याशिवाय नवे कपडे शिवणे शक्य नव्हते.

प्रवास सुसाट सुरू झाला. वीरेन्द्राच्या मनात चमत्कारिक हुरहूर दाटून आली. अनोळखी माणसांबरोबर अनोळखी मुलखाचा प्रवास म्हणजे जरा विचित्रच होते.

पण टिनूच्या अव्याहत बडबडीने तो सुकर वाटत होता. गुप्त काशीवरून रुद्रप्रयागला प्रवासी आले.

रुद्रप्रयागला मंदाकिनी आणि बद्रिनारायणाकडून येणारी अलकनंदा ह्यांचा संगम पाहून चहा-नाष्टा करून मंडळी पुढे निघाली.

टिनूचा चिवचिवाट चालूच होता. आता देवप्रयाग आले.

पपा टिनूला म्हणाले, 'टिनू, आता ही अलकनंदा आणि गंगोत्रीकडून येणारी भागीरथी ह्यांचा इथं देवप्रयागला संगम होतो आणि हीच भागीरथी ऋषिकेशपासून गंगामैय्या म्हणून ओळखली जाते.'

टिनू म्हणाला, 'बाप रे ! ह्या हिमालयात किती हे प्रयाग !'

पपा म्हणाले, 'तुझ्या हे सर्व लक्षात राहायला हवं. पहेलगामला गेल्यावर तुझ्या दोस्तमंडळींना कसं सांगणार ?'

टिनू पाठ केल्यासारखे म्हणाला, 'सोनप्रयागला सोनगंगा नदी आणि बद्रिकेदारहून येणारी मंदाकिनी ह्यांचा संगम होतो. इथं सोनगंगा संपते आणि मंदाकिनी रुद्रप्रयागपर्यंत येते.

रुद्रप्रयागला मंदाकिनी–अलकनंदा संगम होतो. तिथं मंदाकिनी नामशेष होते आणि अलकनंदा देवप्रयागपर्यंत येते.

देवप्रयागला अलकनंदा आणि भागीरथीचा संगम होतो.'

दादीजी म्हणाल्या, 'प्रयाग म्हणजे मीलन. माणसाच्या मनाच्या गंगेचं मीलन दुसऱ्या माणसाच्या मनगंगेशी व्हायला हवं. अशी अनंत मीलनं म्हणजे लोकगंगा.'

वीरेन्द्राला वाटले, मी पहाडी मुलगा आणि हे गुजराथी कुटुंब; पण आमचं हे मनोमीलनच झालं नाही का ? आता मी माझा स्वार्थ विसरायला हवा. ह्या कुटुंबाचं सुख-दुःख माझं स्वतःचं व्हायला हवं, तरच माझं जीवन खऱ्या अर्थानं जीवन होईल.

हा पहाडी मुलगा. त्याला पर्वतीय जीवनाचा चांगला सराव

होता. तरीसुद्धा मोटारीतून होणारे शिखरदर्शन, दऱ्याखोऱ्यांची लांबी आणि खोली, झाडाझुडपांचे वेगाने पळणे, व नद्या, नाले, ओढे ह्यांची संगत– सारे अपूर्व होते.

प्रवासाच्या दुप्पट वेगाने खाण्याचा कार्यक्रम चालू होता. बरोबर घेतलेले खाद्यपदार्थ परत घरी कुठे न्यायचे? म्हणून त्यांचा फडशा पाडला जात होता. विविध तऱ्हेचे खाद्यपदार्थ होते. वीरेन्द्र साऱ्यांबद्दल अनभिज्ञ होता. एका पदार्थाची चव तोंडात रेंगाळत होती ती आवडल्याबद्दलची पावती मनातल्या मनात दिली जात होती. तत्पूर्वी दुसरा पदार्थ हातावर येत होता. वीरेन्द्राला वाटले, आपण असं खात राहिलो तर भूक नावाची चेटकीण असते हेसुद्धा विसरून जाऊ. ह्या भुकेसाठी घरदार सोडावं लागतं, सगीसोयरी अंतरावी लागतात, ऊर फुटेपर्यंत कष्ट करावे लागतात. तरीही मेली चेटकीण शांत होत नाही. उलट जास्तच तीव्र होते. अग्नीत तेल, तूप टाकलं तर तो विझतो का? तो तर जास्तच प्रज्वलित होतो, तीव्र होतो.

ऋषिकेश आलं. गंगास्नान, देवदर्शन वगैरे कार्यक्रम पार पडले. इथे रमेशअंकल गाडी घेऊन आले. रमेशअंकल म्हणजे पपांच्या धंद्यातले पार्टनर. आधी ठरल्याप्रमाणे पपा बद्रि-केदारला गेले आणि अंकल सहाराणपूरला आपल्या घरी जाऊन आले. आता ऋषिकेशहून सर्व मिळून स्वतःच्या गाडीने पहेलगामला जाणार होते.

रमेशअंकलना पाहताच टिनूच्या कपाळावर नाराजीची आठी चढली. ते त्याला बिलकूल आवडत नव्हते.

गाडीजवळ उभ्याउभ्यापेटलेली सिगारेट त्यांनी बाजूला भिरकावली, ती नेमकी एका महारोगी भिकाऱ्याच्या अंगावर

पडली. बिचाऱ्याला चांगलाच चटका बसला. तो म्हणाला, 'भीख-के बदले आपने यह क्या दिया साब ?'

ते बेफिकिरीने म्हणाले, 'पिओ, पिओ ! जी भर के सिगारेट पिओ !'

आणि आपल्या विनोदावर आपणच हसत सुटले. त्या वेळी त्यांचे पान-तंबाखूने रंगलेले तोंड कसेतरीच दिसत होते.

रमेशअंकल वीरेन्द्राकडे पाहत म्हणाले, 'आणि शाहसाब, इस गंवार को कहाँ से उठा लाये ? अगदीच विदूषक दिसतो आहे !'

वीरेन्द्राचा चेहरा गोरामोरा झाला. टिनूला वाटले, ह्या अंकलच्या सणसणीत मुस्काडीत मारावी.

पपा म्हणाले, 'रमेश, इसका नाम वीरेन्द्र है. हमारे टिनू का दोस्त है.'

रमेश म्हणाला, 'टिनूभय्या, तूने दोस्त बडा अच्छा ढूंढ निकाला है ! अरे, जरा सोच समझ के तो काम लेते ?'

ह्यावर कुणीच काही बोललं नाही, पण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर नापसंती स्पष्ट दिसत होती.

मागच्या सीटवर दादी, बा आणि टिनू बसले.

ड्रायव्हिंगला रमेशअंकल बसले. त्यांच्या शेजारी पपा, आणि त्यांच्या बाजूला खिडकीजवळ वीरेन्द्र बसला.

रमेशअंकल आणि पपा आलटून-पालटून ड्रायव्हिंग करणार होते.

वीरेन्द्र संकोचानं अवघडून गेला होता.

★

## सात

रमेशने वीरेन्द्राला गंवार म्हटले. वीरेन्द्र टिनूला एका बाजूला घेऊन म्हणाला, ' मैं तुम्हारे साथ नहीं जाऊंगा. '

त्याचा स्वाभिमान डिवचला गेला होता हे स्पष्ट जाणवत होते.

पपांनीही कुजबूज ऐकली. ते म्हणाले, ' अरे, रमेशला मजाक करायची सवय आहे. तू मनाला लावून घेऊ नकोस. '

वीरेन्द्र ठामपणे म्हणाला, ' नको पण. मला नाहीच यायचं ! '

टिनू अजिजीच्या स्वरात म्हणाला, ' भय्या, असं रे काय करतोस ? हे अंकल श्रीनगरला असतात. तेव्हा तुला पहेलगामला आमच्याकडे यायला काहीच हरकत नाही.'

वीरेन्द्र त्यांच्याबरोबर निघाला. हरद्वारपासून सारा आसमंत बदललेला दिसत होता. तो सपाट भूभाग बघून वीरेन्द्राला सारखं आश्चर्य वाटत होतं. डोंगर-दऱ्यांव्यतिरिक्त प्रदेश असू शकतो ह्याची त्याला कल्पना नव्हती. सभोवती उंचवटे नाहीत, उतार नाहीत, दृष्टिपथात येणाऱ्या टेकड्यासुद्धा नाहीत.आश्चर्यच आहे!

ह्या प्रदेशातली झाडे वेगळी, इथले हवामान वेगळे आणि माणसांचे पोषाख पण वेगळे. हा सारा वेगळा मुलूख पाहून मात्र आपण आपल्या घरापासून फार दूर चाललो आहोत ह्याची जाणीव त्याला टोचण्या देत होती, बेचैन करीत होती.

वेळ सरकत होता, रस्ता संपत होता— पण मनातले विचार

थांबत नव्हते, हुरहूर कमी होत नव्हती.

त्याने विचारले, ' पहेलगाम किती दूर आहे ?'

' अरे, इतक्यात कंटाळलास ? असं पहा, आम्ही बरोबर असताना तुला काळजी करायचं कारण काय ?' पपा समजावणीच्या स्वरात म्हणाले.

बा म्हणाल्या, ' वीरेन्द्र,अरे आमचा गुजरात मुलूख तर कितीतरी दूर आहे—पण आम्ही लोक काश्मीरमध्ये आलोच ना ? अरे बाबा, काही कर्तृत्व करायचं असेल, पैसे मिळवायचे असतील तर आपलं घर, आपलं कुटुंब, आपलं गाव सोडलं पाहिजे. '

दादी म्हणाल्या, ' बेटा, हे सारे ऋणानुबंधाचे लागेबांधे असतात. तुला आमच्याबरोबर आणायची आम्हाला का बुद्धी झाली ? तूही विश्वासानं आमच्याबरोबर कसा निघालास ?—ह्या अशा प्रश्नांना उत्तरं नसतात. हा सारा तिथला अन्नोदकाचा योग असतो, म्हणून हे घडतं. माणसानं फक्त सच्चाई सोडायची नाही एवढं लक्षात ठेव. '

वीरेन्द्राला ह्या दादीजींच्या बोलण्यात स्वतःची दादी कुठेतरी जाणवत होती.

प्रवासाचा हा टप्पा फार मोठा होता, थोडा कंटाळा आणणारा होता. सर्वांची अंगे अवघडून गेली होती. पण व्यवसायाच्या दृष्टीने पपांना मुक्काम करून वेळ घालविणे शक्य नव्हते. रमेशअंकल आणि पपा अधूनमधून व्यवसायाच्या गोष्टी करीत होते. मोटारचे मशिन तापले की थांबत होते, लस्सी वगैरे घेऊन पुन्हा प्रवास सुरू करीत होते. डुलक्या आणि जांभयांच्या साथीने प्रवास चालू होता.

पठाणकोट आल्यावर रमेशअंकलनी दोन मोठी कलिंगडे

मोटारीत आणून ठेवली. रस्त्यावर जिकडेतिकडे कलिंगडांचे, खरबुजांचे ढीग लागले होते. भाजीपाल्याच्या गाड्या ओसंडून वाहत होत्या. वीरेन्द्राला ह्या साऱ्यांचेच आश्चर्य वाटत होते. इतक्या प्रमाणात भाज्या त्याच्या कल्पनेतही नव्हत्या.

रमेशअंकल म्हणाले, 'मी इथं थांबतो आणि इथून परस्पर श्रीनगरला जाईन.'

रमेश गेल्यावर वीरेन्द्र आणि टिनूने सुटकेचा श्वास सोडला. दादीजी पपांना म्हणाल्या, 'रमेशला तू इतक्या जवळ का करतोस? तुला काही दुसरा भागीदार मिळत नाही का?'

पपा म्हणाले, 'मलासुद्धा तो आवडत नाही. पण माणूस व्यवसायाला चांगला आहे, जाणकारही आहे. म्हणून त्याचे दोष मी दृष्टीआड करतो.'

पठाणकोट ते पहेलगाम हा प्रवास अत्यंत अवघड पण थ्रिलिंग. पठाणकोट ते जम्मू हा रस्ता तसा खूप चांगला होता, पण जम्मू ते पहेलगाम हा रस्ता मात्र खतरनाक, वळणावळणाचे घाट पार करायला लावणारा होता. प्रत्येक वळण धोकादायक होते. मार्ग अरुंद आणि अव्याहत मिलिटरी ट्रक्सची वाहतूक. त्यामुळे ठिकठिकाणी खोळंबून राहावे लागत होते.

पुढे व्हिरनाग, अनंतनागमार्गे पहेलगामला सर्वजण येऊन पोहोचले. पहेलगाम पाहताच वीरेन्द्र आनंदाने हरखून गेला. सभोवती उंचच उंच पर्वतशिखरे होती. त्यांतली काही बर्फाळ, चंदेरी होती. चहूबाजूंनी हिमालयांनी वेढलेले पहेलगाम म्हणजे कोंदणात बसविलेल्या हिऱ्यासारखे दिसत होते.

खळाळून वाहणारी लीदार नदी मंदाकिनी नदीची आठवण करून देत होती. सुसाट वारे अंगाला झोंबत होते, खुपत होते—

पण त्याची जवळीक वीरेन्द्राला हवीशी वाटली.

पपांचे स्वतःच्या मालकीचे लॉज होते. ह्या लाकडी तीन मजली लॉजसमोर त्यांची गाडी येऊन उभी राहिली. वीरेन्द्र खाली उतरला. त्याला त्याचा आनंद लपविता आला नाही. त्याने गाडीतले सामान भराभर काढले, तेवढ्यात हॉटेलचे गडी धावत बाहेर आले. डिकीतले आणि टपावरचे सामान काढले गेले. वीरेन्द्राचा प्रवासाचा शीण तर नाहीसा झालाच, उलट अनोखा उत्साह उसळून आला. आपल्या पहाडी मुलुखातच आपण आहोत असा त्याला भास झाला.

पपा म्हणाले, 'लछमनभय्या, ये देखो हम तुम्हारे लिये केदारनाथ से उपहार लायेहैं. वीरेन्द्राला तुझ्या खोलीत जागा दे. आणि त्याला हॉटेलचे काम करायला शिकवणे हे तुझे काम, समजलास ?'

लछमनसिंग वीरेन्द्राचा आजोबा शोभेल इतका मोठा होता. काही वर्षांपूर्वी तोसुद्धा पहाडी प्रदेशातून इथे आला आणि इथे कायम स्थायिक झाला.

लछमनची खोली मोठी सुबक होती. एका भिंतीजवळ बाज होती. त्यावर घोंगडीचे अंथरूण होते. भिंतीला देवाचे दोन फोटो होते. त्याची पत्र्याची पेटी, तांब्या-भांडे असे किरकोळ सामान होते. खोलीत आल्यावर वीरेन्द्राला एकलेपणा नाहीसा झाल्यासारखा वाटला.

लछमन म्हणाला, 'मुला, त्या खाटेवर बैस.'

वीरेन्द्र बसला. त्याने आपल्या अंगातला तो गोधडीसारखा शर्ट काढला. तो झटकला, उलटा केला आणि पुन्हा अंगात घातला. दोन शर्ट एकमेकांना जोडल्यामुळे आता बाहेरचा निळा शर्ट आत झाला आणि आतला गुलाबी शर्ट बाहेर झाला. त्याला जरा

तेवढेच बरे वाटले.

लछमनकाकाने स्वत: पकवलेली डाळ-रोटी त्याला खायला दिली. तो म्हणाला, 'मालक गुजराथी आहेत. त्यांचा डाळ-भात आपल्या पहाडी लोकांना मिळमिळीत वाटतो म्हणून मी माझी डाळ-रोटी पकवतो. घे, आता खाऊन घे.'

प्रवासात खाल्लेल्या मिठाई, फळफळावळीपेक्षा ही डाळ-रोटी चविष्ट होती.

लछमनकाकाने उच्चारलेल्या 'आपल्या पहाडी लोकांना' ह्या शब्दप्रयोगामुळे वीरेन्द्राला लछमनकाकांबद्दल जास्त जवळीक निर्माण झाली.

हे लाकडी हॉटेल बांधण्यामागे सोय, हौस आणि काटकसर ह्या साऱ्यांचा अंतर्भाव होता. इथली मनस्वी थंडी आणि चावरे-बोचरे वारे ह्यांपासून इथे ऊब मिळते, संरक्षण मिळते. इथल्या जंगलात विपुल लाकूड असल्याने सिमेंट कॉंक्रीटच्या घरापेक्षा ह्या लाकडी घरांचे बांधकाम स्वस्त पडते. शिवाय शहरी लोकांना अशा घरात राहायला आवडते. ती फॅशन खूप रूढ होत आहे. तेवढेच नावीन्य, तेवढाच वेगळेपणा.

लछमनकाकाच्या संगतीमुळे निश्चिंत झालेले मन आणि भरपूर अंथरूण-पांघरूण ह्यांमुळे रात्री वीरेन्द्राला गाढ झोप लागली.

★

## आठ

वीरेन्द्र उठण्यापूर्वीच लछमनकाकाने त्याची कांगडी तयार करून ठेवली. काथ्याच्या छोटयाशा शिकाळयात छोटेसेच खापराचे गोलाकार भांडे ठेवून त्यात विस्तव ठेवला. ते निखारे फुलले नव्हते पण फक्त धुमसत होते. कांगडी तापत होती.

रात्रभर शांत झोपलेला वीरेन्द्र मोठ्या उत्साहाने उठला.

लछमनकाका म्हणाला, 'हे बघ, ही तयार केलेली कांगडी गळयात घाल आणि हा गरम कोट घालून वर चल. मी तुला तिथं एक गंमत दाखविणार आहे.'

वीरेन्द्र तारुण्यसुलभ जोषाने म्हणाला, 'काका, मला गरम कोटाची गरज नाही– आणि माझ्यासारख्या जवानाला कांगडी कशाला ?'

काका म्हणाला, 'अरे पगले, तू पहाडी मुलगा आहेस– पण बाबा, पहाडा-पहाडात फरक असतो. आपल्या ह्या खोलीत ऊब आणणारी शेगडी आहे. शिवाय खोलीचे दार बंद आहे म्हणून तुला बाहेरच्या थंडीची कल्पना नाही. बहस मत कर. जल्दी उपर चल. नाहीतर गंमत संपून जाईल.'

वीरेन्द्राने उबदार कांगडी लॉकेटसारखी गळयात घातली. वरून गरम, पायघोळ कोट घालून तो काकांच्या मागोमाग निघाला. खिडकीतून शिखरदर्शनाचा काय अप्रतिम देखावा दिसत होता !

चौफेर असलेली बर्फशिखरे झळाळून निघाली होती. चहूकडे प्रभा फाकली होती. त्यामुळे बर्फाला चंदेरी झिलई चढली होती. नजर आधाशी झाली होती. कितीही पाहिले तरी तृप्ती होत नव्हती. तेवढ्यात सूर्याचा पहिला किरण निसटला आणि तो पूर्व-शिखराच्या विशिष्ट बिंदूवर स्थिरावला.

लछमनकाका तिकडे अंगुलिनिर्देश करून म्हणाला, 'वीरेन्द्र, उधर देख, उधर देख.'

बर्फ आणि सूर्यकिरण ह्यांच्या मीलनामुळे ते शिखर सप्तरंगात न्हाऊन निघाले. तिथे विविध रंगांचा जणू पंखा निर्माण झाला. तजेलदार तांबडा, जांभळा, गर्द निळा, पिवळा, रेशमी, गुलाबी इत्यादी रंगांची उधळण त्या इवल्याशा बिंदूतून परावर्तित होत होती. विविध रंगांचे जणू भांडारच उधळले गेले होते.

त्या बिंदूच्या रूपाने जणू मत्त मयूर आपला सप्तरंगी पिसारा फुलवून नाचत होता.

हा विलोभनीय देखावा काही क्षणच टिकला. त्या सूर्यकिरणांची जागा बदलली. शिवाय त्याच्या जोडीला इतर किरण झेपावले. त्यांची दाटी झाली. त्यामुळे तो बिंदू संकोचला आणि त्याने आपले रंगभांडार बंद करून घेतले.

लछमनकाका त्या सप्तरंगांची उधळण वीरेन्द्राच्या चेहऱ्यावर पाहत होते. त्याचे आनंदाने लकाकणारे डोळे, त्याचे उत्फुल्ल ओठ, गालांच्या गोबरेपणाची मजेशीर हालचाल, हनुवटीचा आविष्कार– सारे सारे कसे किशोरवयाला शोभणारे होते. काकाचे वात्सल्य, प्रेम वीरेन्द्रामुळे जागृत झाले व त्याने वीरेन्द्राची जवळीक साधली. चला, माझ्या जीवनातला रूक्षपणा संपला, असे त्याला वाटले.

तो म्हणाला, 'पाहिलंस वीरेन्द्र, निसर्ग कशी अजब किमया करतो ? बहुत अच्छा ! वाह ! वाह ! क्या कहना !'

वीरेन्द्राला आपला मनस्वी आनंद शब्दांत सांगता येईना.

काका पुढे म्हणाला, 'अरे, ही सभोंवती सर्वच बर्फशिखरं आहेत, पण सगळी सारखी नाहीत हे तुझ्या लक्षात आलं ना ? तू पहाडातला मुलगा आहेस. शिवाय हा सारा पहाडी मुलूख आहे. तरीसुद्धा तुला इथली थंडी, इथलं हवामान सोसेलच असं नाही. बाबा, इथं सर्वांना कांगडी बाळगावी लागते, गरम कोट घालावाच लागतो. त्याची गरज नाही म्हणून चालत नाही, समजलं ?'

लछमनकाकांच्या हाताखाली तो हॉटेलचे काम शिकत होता. त्याला चांगले कपडे घालायला मिळत होते व चांगले अन्न पोटात जात होते. हे त्याचे वाढणारे वय त्याच्या शरीरप्रकृतीला पोषक असणाऱ्या वातावरणात फुलत होते, उमलत होते.

दुपारच्या अगर रात्रीच्या विश्रांतीच्या वेळी टिनू त्याला अक्षर-ओळख करून देत होता. आठ वर्षांचा टिनू सोळा वर्षांच्या वीरेन्द्राचा शिक्षक झाला होता. विद्यार्थ्याची बुद्धी चांगली तल्लख होती त्यामुळे बौद्धिक घोडदौड चालू होती.

पहेलगामला बरेच परस्थ प्रवासी येत होते, पण केदारनाथ आणि पहेलगामच्या प्रवाशांत महदंतर होते. तिथली माणसे श्रद्धाळू आणि केदारनाथाच्या दर्शनाने कृतार्थता मानणारी होती, तर पहेलगामला येणारी मंडळी चैन, मजा, ऐष ह्यांत मश्गुल होती. त्यांचे ते उच्च राहणीमान, चित्रविचित्र फॅशन्स, त्यांचे चैनी खाणे-पिणे व निरर्थक हिंडणे वगैरे सर्वच वेगळे होते.

इथे एकसे एक बढकर असलेल्या हॉटेलवाल्यांची त्यामुळे चांगली चलती होती.

मुलूख पहाडी असला तरी निसर्ग भिन्न आहे हे वीरेन्द्र पाहत होता. इथे सफरचंदांची झाडे रानोमाळ पसरली आहेत. अक्रोडाची बनेच्या बने आहेत. शिवाय चिनार, देवदार, सूचिपर्ण इत्यादी विविध झाडे अनोळखी आहेत.

हरहुन्नरी लोक सारखे व्यवसायात गुंतलेले आहेत. इथली बायका-मुले छानदार गालिचे विणतात. अक्रोडाच्या लाकडापासून कोरीव वस्तू बनवतात. लोकरीचे सुरेख कपडे तयार करतात. जे ज्याला जमेल ते तो करीत असतो.

बरं झालं मी ह्या प्रांतात आलो. माझ्यात चांगला बदल घडेल. माझ्या आई-वडिलांना अजून काहीही कल्पना नाही की मी इथं पहेलगामला आहे, माझं ओझी वाहण्याचं कष्टाचं काम थांबलं आहे. मला कष्ट करावे लागतात ह्या कल्पनेनं माझी माता गहिवरत असेल. तिच्या घशाखाली घास उतरत नसेल. मोहनसिंग, श्यामसिंग जेव्हा परत आपल्या गावाला जातील तेव्हाच आईला माझ्याबद्दल कळणार.

मी टिनूभय्याजवळ भराभर लिहायला शिकेन व पिताजींना पत्र लिहीन, माझी खुशाली कळवीन.

पण त्यांना बिचाऱ्यांना माझं पत्र कसं वाचता येणार ? गावच्या मुखियाकडून दादा-पुता करुन ते वाचूनघ्यावं लागेल. मला लिहिता येऊ लागलं हे पाहून त्यांना केवढा आनंद होईल !

माझी 'धुरू' तर आनंदाने नाचायला लागेल व टाळ्या वाजवून म्हणेल,

'हमारे भय्याजी तो लिख्खे पढे–
थे अनपढ़ यहाँ कौन आया । दिया दिखैयो
अटरिया में चोर अम्मा दिया दिखैयो ॥'

दिवस खूप आनंदात आणि मजेत जात होते.

लछमनकाका म्हणाले, 'अमरनाथची यात्रा श्रावण महिन्यात असते व पहेलगामहूनच अमरनाथला जावं लागतं. त्यामुळे इथं कंडी, दंडी, घोडे आणि कुली ह्यांची झिम्मड उडते. यंदा दादीजींना ह्या यात्रेला जायचं आहे.'

वीरेन्द्र चटकन म्हणाला, 'साव जर म्हणाले तर मीसुद्धा त्यांच्याबरोबर जाईन.'

हे ऐन उन्हाळ्याचे दिवस, पण पहेलगाम मात्र थंडीने कुडकुडत होते. त्या दिवशी तर कहरच झाला. दारात उभ्या असलेल्या प्रवासी बसच्या टपावर रात्री पडलेल्या दवाचे बर्फ झाले होते. त्याची जाडी चांगली चार बोटे होती. वीरेन्द्र टपावर चढला आणि त्याने बर्फाचा थर खोऱ्याने खरवडून काढला. मोटारचे इंजिन गारठले होते. ते काही केल्या सुरू होईना.

मग इतर गडी-माणसे, कुली ह्यांनी गवत, कागद, काड्या वगैरे मोटारखाली ठेवून पेटविले. अर्थात विस्तव तसा मंद ठेवला होता. मग एक तासाने इंजिन तापले आणि मोटार सुरू झाली. अशी गंमत अधूनमधून होत राहायची.

टिनू त्याला एकदा हळूच म्हणाला, 'उद्या आपल्याला श्रीनगरला जायचं आहे. अरे, त्या रमेशअंकलनं खूप गडवडघोटाळा केला आहे. पपा फार संतापले आहेत. ते अचानक श्रीनगरच्या आमच्या हॉटेलला भेट देणार आहेत.'

'असं ?' वीरेन्द्राच्या त्या उद्गारांत बराच काही अर्थ सामावला होता.

★

दा. क्र. १८६७ दिनांक १२।१।८६
विषय बा-वा.

## नऊ

मर्सिडीझ दाल लेकसमोर येऊन थांबली. सायंकाळची वेळ होती. प्रवासीमंडळींनी दाल सरोवर नुसते फुलून गेले होते. मोठमोठ्या हाऊसबोटी प्रौढपणाचा आव आणून पलीकडल्या किनाऱ्यालगत शांतपणे उभ्या होत्या. त्यांचा भव्य आकार दारे-खिडक्यांना लावलेले आकर्षक पडदे, प्रत्येकीच्या नावाच्या डौलदार पाट्या आणि त्यांची फडकणारी वेगवेगळी निशाणे, सारेच काही भारदस्त होते.

नखरेल शिकारे मुरकत मुरडत इकडून तिकडे पळत होते. त्यांचा आटोपशीर सुबक आकार, त्यांची जलद लय व अस्थिरपणा किशोरवयीन मुलांची याद करून देत होता.

पपांनी खूण करताच एक शिकारा त्यांच्या नजदीक आला. प्रथम पपा आत चढले. टिनू तर छलांग मारून आत गेला. पण वीरेन्द्राला हा अनुभव नवा होता, त्यामुळे तो प्रथम बिचकला. पपांनी त्याला हात दिला व शिकाऱ्यात घेतले.

पाण्याचा अस्थिरपणा, पण त्यात पाय घट्टपणे रोवून बसण्याचा अनोखा आनंद वीरेन्द्राला जाणवला. कधी कधी भोवतालची

परिस्थिती आपल्याला अनुकूल नसते, ती अस्थिर आहे ह्याची पुरेपूर खात्री असते तरीसुद्धा तिथे पाय रोवून उभे राहावे लागते. ते टाळून चालत नाही. वीरेन्द्राला वाटले की, पपांना माहीत आहे रमेशअंकल चलाख माणूस आहे, पण हे त्याच्याशी सलोखा असल्याचं नाटक करीत आहेत. हात गुंतला असेल तर थोडं सोसायला हवं व मग हात सोडवून घ्यायला हवा. हेच धोरण पपा अवलंबीत असावेत.

शिकाऱ्यात छोटीशी गादी होती. रेलून बसायला लोड आणि टेकायला तकिये होते. त्यांवर नाजूक भरतकाम केलेले होते. त्यांवर चिमुकला मांडव घातला होता. त्याला रंगीबेरंगी झालरी व गोंडे लावले होते. शिकारा मोठा नखरेल आणि गुलहौशी दिसत होता. एक बारा-तेरा वर्षांची मुलगी हातात वल्हे घेऊन टोकाला बसली होती.

एवढ्याशा मुलीचे ते वल्हवणे पाहून वीरेन्द्र थक्क झाला. तिचे टमाटरसारखे लालबुंद गाल तिच्या गोऱ्या रंगाला खुलून दिसत होते. निमुळती हनुवटी, काळेभोर करवंदी डोळे म्हणजे सौंदर्याची अप्रतिम शिल्पाकृती होती. नाव वल्हवताना तिचा खांद्यावरचा जांभळा दुपट्टा सारखा हातावर सरकत होता. तिचे चिमुकले हात आणि खांदे लयबद्ध हालचाल करीत होते. मधूनच ती टिनूकडे पाहून खुदकन हसत होती. तिच्या कुंदकळ्या प्रसन्न-पणे चमकत होत्या.

ही हसरी चांदणी, नौकाविहार, सभोवतीचा मोहक निसर्ग आणि प्रसन्न हवामान–सगळे कसे सुसंगत होते. इथे विसंगतीला थारा नव्हता.

शिकाऱ्याच्या दुसऱ्या टोकाला एक प्रौढ नावाडी बसला होता.

तो प्रथम वीरेन्द्राने पाहिलाच नव्हता. त्याच्या हातात भला मोठा बांबू होता. तो तलावात योग्य ठिकाणी रोवून शिकाऱ्याला दिशा देत होता. त्याच्यावर शिकाऱ्याची बरीच मदार होती.

शिकारा चार चिनारकडे चालला होता. सरोवरच्या उजव्या बाजूला प्रशस्त राजरस्ता होता आणि त्याला लागूनच पलीकडे काश्मीरमधल्या प्रसिद्ध आलिशान बागा होत्या.

पपा म्हणत होते, 'ह्या चष्मेशाही, निशात, शालिमार वगैरे राजेशाही बागा आहेत. ह्या आपण सवडीनं पाहू. पण ह्या सर्व बागा मुगल बादशहाच्या अमदानीत निर्माण झाल्या. मुगललोक तसे षौकीन, हौशी आणि रंगेल. तेव्हा त्यांनी आपला षौक म्हणून ह्या निर्माण केल्या. पुढं इंग्रजांच्या राज्यात त्यांची चांगली जोपासना झाली व त्या उदयाला आल्या.'

टिनू म्हणाला, 'पपा, आपण उद्या पहाटे शंकरटेकडीवर जाऊ. वीरेन्द्रभय्याला ते स्थळ खूप आवडेल.'

पपा म्हणाले, 'वीरेन्द्र, आपले आद्य गुरू शंकराचार्य ह्यांचं स्मारक म्हणून त्या उंच टेकडीवर त्यांचा पुतळा बसविला आहे. इतक्या उंचीवरून सर्व श्रीनगरचं खोरं फारच सुंदर दिसतं.'


वीरेन्द्र म्हणाला, 'बद्रिकेदार मंदिराच्या पिछाडीला त्यांचा मठ आहे तेच शंकराचार्य ना?'

आता वल्हे त्या प्रौढ नावाड्याने ताब्यात घेतले होते. तो पपांना म्हणाला, 'साब, आपका वह आदमी हमे बहुत तकलीफ देता है. जुर्माना मांगता है और दम भरता है.'

पपांच्या मालकीचे श्रीनगरमध्ये हॉटेल होते. एक हाऊसबोटही होती. त्याची व्यवस्था रमेश बघत होता. ही तक्रार त्या रमेश-बद्दलच होती.

दाल सरोवरात चिनारचे चार वृक्ष होते. त्यांचा योग्य उपयोग करून सरोवरातच कृत्रिम हॉटेल उभारलेले होते. तेच हे 'चार चिनार' हॉटेल होय.

कृत्रिम, अधांतरी जमीन तयार करून छानदार गवत लावून लॉन तयार केले होते आणि चारी बाजूंनी पाईपचा कठडा तयार केला होता. टिनू आणि पपा हॉटेलच्या आत गेले. वीरेन्द्र तिथेच एका बाजूला लॉनवर बसला. लॉनवर ठिकठिकाणी टेबले-खुर्च्या



टाकून बसण्याची सोय केली होती. वीरेन्द्राचे लक्ष पलीकडे बसलेल्या रमेशअंकलकडे गेले. तो मित्रांसह खास ड्रिंक घेण्यात मश्गुल होता. पहेलगामला आल्यापासून वीरेन्द्र आमूलाग्र बदलला होता. रमेशने त्याला पाहिला असता तरी ओळखता येणे शक्य नव्हते.

रमेश आणि त्याच्या दोस्तांना चांगलीच नशा चढली होती आणि त्या भरात ते काहीही बरळत होते. शाहसाब कसा बुद्दू आहे, त्याला मी कसा चकवतो, ह्याचं रसभरित वर्णन रमेश करीत होता. पपांची टीका त्याला सहन होत नव्हती. आपले

शिवशिवणारे हात तो मोठ्या संयमाने आवरीत होता.

नशेच्या भरात तो बोलत होता, 'जुन्या श्रीनगरमध्ये शेवटच्या गल्लीतलं शेवटचं अबदुल्लाचं घर मी रिझर्व केलं आहे. आता कशी चाल करायची ते मी पाहतो. तुम्ही मला फक्त मदत करा. मी तुम्हाला दहा-दहा हजार कॅश देईन.'

इतक्या उघड्या जागेत ही मंडळी किती गुप्त गोष्टी बोलत आहेत! हॉटेलमध्ये गर्दी नसली म्हणून काय झालं? ह्या दारूच्या नशेत त्यांना स्थळ-काळाचंसुद्धा तारतम्य नाही राहिलं?

टिनू आणि पपा हॉटेलमधून येताना दिसले. वीरेन्द्र चटकन उठला आणि त्यांच्याबरोबर बागेच्या पायऱ्या उतरू लागला व शिकाऱ्यात आला.

रमेशअंकलच्या वक्तव्याबद्दल बोलावे की बोलू नये अशा संभ्रमात तो होता. शिकारा आपला मार्ग आक्रमण करीत होता. शिकारा नगीन लेककडे चालला होता. नगीन लेक म्हणजे जणू कमळाचे तळे. तिथे कमळांचे जणू बन असते. पण आता कमळाचा सीझन नव्हता. उथळ पाण्यात लोक चिखल चिवडीत होते व कमळाचे कंद काढीत होते. त्यांच्या खाद्यपदार्थांत कमळकंदाचा समावेश असतो.

नगीन लेक जरा उदासीन, एकीकडे आणि ओका ओका वाटत होता. इथे पाण्यावर तरंगत्या जमिनी होत्या. त्यांवर छोटी-मोठी लागवड केली होती.

नावाडी म्हणाला, 'इथं तरंगणारं शेवाळं एकत्र करतात. त्यावर वाळलेलं गवत पसरतात. नंतर लाकडाचा भुसा पसरतात व मग शेवटी मातीचा पातळ थर देतात आणि ह्या तरंगत्या जमिनीवर हळवं धान्य, भाजीपाला ह्यांची लागवड करतात. ह्या

जमिनी सोयीप्रमाणे सरकविता येतात.'

शिकाऱ्याचा आता परतीचा प्रवास सुरू झाला. बराच वेळ पाण्यावर तरंगण्याचा आनंद काही वेगळाच होता. आता परतीच्या प्रवासात उजवीकडे बोट करून पपा म्हणाले,

'हे जुनं श्रीनगर. इथं जुना राजवाडा आहे. गालिचे विणण्याचे छोटे-मोठे कारखाने आहेत.' 'जुनं श्रीनगर' म्हटल्यावर वीरेन्द्राला लगेच आठवलं, शेवटची गल्ली, अबदुल्लाचं घर.

काय रहस्य असेल तिथं ?

★

## वहा

पपांच्या ' राजेन्द्र ' लॉजवर तिघेजण मुक्कामाला आले. त्यांना पाहताच रमेशअंकल क्षणभर दचकल्याचे वीरेन्द्राच्या लक्षात आले.

रमेश हसत हसत पुढे आला आणि म्हणाला, ' आवो, आवो शेठ. एकदम न कळविता आलात ?'

पपा म्हणाले, ' अजून टिनूच्या शाळेला सुट्टी आहे. म्हटलं, वीरेन्द्राला श्रीनगर दाखवून आणावं. '

' कोण ? हा वीरेन्द्र ? तो पहाडी मुलगा ?' रमेशच्या प्रत्येक उद्‌गारात आश्चर्य होते.

तो पुढे म्हणाला, ' ह्याला काश्मीरची हवा चांगलीच मानवलेली दिसते. किती तगडा झाला आहे ! शिवाय गाजरासारखा लालही.' वीरेन्द्र वरवर हसला! पण मनात म्हणाला, अरे चोरा! तू रेड्यासारखा माजला आहेस ते पहा आधी. बाहेरून जसा काळाकुट्ट आहेस तसंच तुझं अंतःकरण काळंकुट्ट आहे. तुला काश्मीरला ठेवा नाहीतर नंदनवनात ठेवा, तुझा पक्का रंग जाणार नाही. कपटी ! चार चिनारवर तू पपांना शिव्या देत

होतास आणि आत्ता तोंडपुजेपणा करतो आहेस? मांजर जरी डोळे मिटून दूध पीत असलं तरी त्याला कुणीतरी बघत असतंच.

सर्वांची जेवणे झाली. टिनू आणि वीरेन्द्र झोपायला गेले. सर्वत्र सामसूम झाल्यावर पपा आणि रमेशचे उच्च स्वर ऐकू येऊ लागले. ही मुले झोपली होती त्यालगतच ऑफिसरूम होती. त्यामुळे तिथे बोललेले सारे स्पष्ट ऐकू येत होते.

आता उच्च स्वराला भांडणाची धार आली होती. अद्याप-पावेतो पपांचा असा चढा स्वर वीरेन्द्राने ऐकला नव्हता. आज ते चांगलेच चिडलेले दिसत होते.

टिनू अगदी घाबरून गेला. 'भय्या, तू जरा तिथं जाऊन पहा ना. अरे, कदाचित रमेशअंकल पपांना मारतीलसुद्धा.'

वीरेन्द्र म्हणाला, 'छे छे! ते बरं नव्हे. मोठ्यांच्या भांडणात लहान मुलांनी तोंड घालू नये. त्या रेड्यानं पपांना मारलं तर त्यांचे हात काही केळी खायला जायचे नाहीत!'

तो रागाने लालबुंद झाला. टिनूची मात्र गाळण उडाली होती.

'भय्या, मी तुझ्या गादीवर झोपायला येऊ का रे? मला भीती वाटते!'

वीरेन्द्राचा स्पर्श त्याला आधार देणारा वाटला आणि टिनूचा स्पर्श वीरेन्द्राला सुखावून गेला.

मी टिनूला जपलं पाहिजे. अगदी धाकट्या भावाप्रमाणे त्याला आधार दिला पाहिजे.

दोघेही एकमेकांच्या कुशीत झोपले.

सकाळी नाष्टा करून ती तिघे बाहेर पडली. काल रात्री एवढी तणातणी झाली तरी रमेश पुन्हा दात विचकून हसत हसत

बाहेरपर्यंत निरोप द्यायला आला. 'दुपारी जेवायला येणार?' असेही विचारले. ह्या नाटकीपणाचा वीरेन्द्राला संताप आला. आधी सगळ्या बागा बघून मग शंकरटेकडीवर जायचे होते. उद्यानामध्ये वसंतबहार विविधरंगी फुलांतून बहरला होता. त्या विस्तीर्ण बागा अतिशय व्यवस्थित रीतीने सुशोभित केल्या होत्या. त्या बागेत मधूनच स्थानिक काश्मिरी मुलींचा घोळका भेटे. कुणी तिथल्या वाळलेल्या काड्या-गवत गोळा करायला आल्या होत्या तर कुणी सहज म्हणून आल्या होत्या.

काश्मिरी सौंदर्य जगप्रसिद्ध आहे. ह्या मुलींच्या माध्यमातून ते सौंदर्य बघायला सापडत होते. ह्या छोट्या छोट्या मुली एका-पेक्षा एक सरस आणि सौंदर्याची जणू शिल्पाकृती होत्या. त्यांचे सफरचंदी गोबरे गाल, लिपस्टिक लावल्यासारखे गुलाबी ओठ, नितळ कपाळपट्टी, इवलीशी लाडिक हनुवटी व पाणीदार, तजेल-दार डोळे. अंगावर कपडे फाटके, जुने, मळके—पण त्यांचे नैसर्गिक सौंदर्य अपूर्व. त्यांना कृत्रिम प्रसाधनांची जरूरच नव्हती. त्यांची गरिबी आणि सौंदर्याची श्रीमंती हे सकृतदर्शनी विसंगत दिसत होते.

परप्रांतीय, परदेशी प्रवासी ह्या मुलींचे भराभर फोटो काढून घेत होते. पण फोटो काढून झाला की त्या मुली आपले इवले इवले हात पैशांच्या आशेने पुढे करायच्या, हे मनात फारच खटकत होते. भाषा अनभिज्ञ असून जवळीक साधत होती. चष्मेशाही उद्यानातला वेगवान उच्छ्वास साऱ्या श्रीनगरला पाणीपुरवठा करीत आहे. ते जिवंत पाणी मोठ्या उत्साहाने आणि वेगाने बाहेर येत होते.

वीरेन्द्राला तो चष्मा (उच्छ्वास) पाहून वाटले, आमच्या

पहाडी लोकांच्या भावनासुद्धा अशाच शुद्ध आणि स्वच्छ असतात. एक पोटात, एक ओठांत आम्हाला जमतच नाही. जर का आम्ही तेढ धरली अगर वैर निर्माण झालं तर मात्र एक घाव दोन तुकडे. असा आमचा खुल्लमखुल्ला स्वभाव असतो. मग परिणामांची क्षिती आम्ही बाळगत नाही.

आमच्या ठिकाणी एखाद्याबद्दल सद्‌भाव निर्माण झाला, प्रेम जडलं तर मात्र आम्ही आमचं सर्वस्व देऊन मोकळे होतो. हे शहरी लोक मात्र फार वेगळे आहेत. ह्यांचं प्रेमही कळत नाही, ह्यांचं वैमनस्यही समजत नाही. अत्यंत धोकेबाज, स्वार्थी. 'मुख में राम, बगल में छुरी' असा ह्यांचा स्वभाव असावा.

शंकरटेकडीवर पपा आपल्या गाडीने गेले, पण वीरेन्द्र आणि टिनू मात्र चालत निघाले. टेकडीची चढण चढताना दाल सरोवराचा विस्तीर्णपणा डोळ्यांत भरत होता. हाऊसबोटींची एका कडेची रांग, शिकाऱ्यांची वळवळ, दूरवर दिसणारे 'चार चिनार' हॉटेल, दालचे चकाकणारे पाणी, त्यात तरंगणारे आकाशाचे स्वच्छ निळे प्रतिबिंब– सारे कसे मनाला मोह पाडणारे होते. टिनूची कॉमेंट्री पण फार गोड वाटत होती. अतिशय थंडी पडली की ह्या सरोवराचं रूपांतर बर्फात होते. ह्या बर्फभूमीवर हौशी लोक स्केटिंग करतात. पण बोट हेच ज्यांचे घर आहे, बोट हेच ज्यांचे पोट आहे अशा गरीब लोकांचे फार हाल होतात. पाण्याशिवाय होडी नाही आणि होडीशिवाय संसार नाही, अशी त्यांची अवस्था असते.

श्रीनगरमधले बरेच गरीब लोक तरंगत्या बोटीतच राहतात. पण ह्या लोकांमुळे आणि हाऊसबोटीतल्या प्रवाशांमुळे सरोवराचे पाणी अत्यंत घाण होते. त्यामुळे हाऊसबोटीचे आकर्षण असून,

नावीन्य असूनसुद्धा काही लोकांना तिथे राहणे आवडत नाही.

विलोभनीय परिसर पाहता पाहता दोघं केव्हा वर येऊन पोहोचले ते समजलेसुद्धा नाही.

टेकडीवरच्या पवित्र वातावरणात, स्वच्छ सुंदर हवेत श्रीनगरचा परिसर पाहताना मन कसे धुंद झाले होते. आद्य शंकराचार्यांचे कर्तृत्व आणि महती पपांनी सांगितली व ती तिघे झाडाखाली बसले.

टिनू म्हणाला, 'पपा, काल रमेशअंकल तुमच्याशी का हो भांडत होते ?'

पपा म्हणाले, 'हिशेबात त्यानं खूप घोटाळे केले आहेत. तो नोकरवर्गाशी अरेरावीनं वागतो. नोकरवर्गावर तर धंद्याची सारी भिस्त असते.'

'पण रमेशअंकल फारच आरडाओरड करत होता ना ?' इति टिनू.

पपा म्हणाले, 'खोटया माणसांना असा आरडाओरडा करूनच आपला खोटेपणा लपवायचा असतो.' पपा वीरेन्द्रकडे पाहून म्हणाले, 'तीन वर्षांपूर्वी माझ्याकडे आला तेव्हा अक्षरशः भणंग-भिकारी होता. मी त्याला आधार दिला व त्या हॉटेलच्या देख-रेखीचं काम दिलं. तोच आज ह्या हॉटेलचा मालक होऊ पाहतो आहे.

शिवाय मला माझ्या विश्वासातल्या नोकरानं सांगितलं की, तो आपल्या हॉटेलचा गैरवापर करतो, इथं दारूअड्डा चालवितो.'

वीरेन्द्र म्हणाला, 'त्याची चलाखी आपल्या लक्षात आली केव्हा ?'

पपा म्हणाले, 'मीसुद्धा व्यापारी बच्चा आहे. वर्षा-सहा

महिन्यांत मला थोडे घोटाळे कळू लागले. पण मी म्हटलं, जाऊ दे. तळं राखील तो पाणी चाखणारच. पण तो इतक्या मोठ्या प्रमाणावर उलाढाल करीत असेल ही कल्पना आली नाही. शिवाय दारूअड्डा म्हणजे महाभयंकरच.'

टिनू म्हणाला, 'त्याला आत्ताच्या आत्ता हाकलून द्या.'

पपा म्हणाले, 'दुर्जनं प्रथमं वंदे। ह्याच्याशी वागताना अत्यंत सावधपणे पावलं उचलली पाहिजेत. गनिमी काव्यानं व्यवहार सोडवून घ्यायला हवेत. थोडा वेळ लागला तरी चालेल.'

ते वीरेन्द्राला म्हणाले, 'वीरू, माझ्या मनात हाऊसबोटीची व्यवस्था तुझ्यावर सोपवायची आहे. तू लवकर लिहाय-वाचायला शीक, हिशोबठिशोब समजावून घे.'

वीरेन्द्राला वाटले, छे ! मला तर श्रीनगर बिलकूल आवडलेलं नाही. वाह्यसौंदर्यानं नटलेला हा प्रदेश, इथली सौंदर्यसंपन्न माणसं वगैरे प्रथमदर्शनी आकर्षित करणारी आहेत, पण ह्यांच्याजवळ आंतरिक सौंदर्य असेल का ? इथली माणसं तशी घुमी वाटतात. सहज बोलण्यातसुद्धा काहीतरी डावपेच असावा अशी झलक असते. आणि पाणीदार डोळे कुठेतरी धुरकटलेले, मलीन झाल्यासारखे वाटतात. श्रीनगरपेक्षा पहेलगाम चांगलं आहे.

हाऊसबोट आज रिकामी होती. कुणीच प्रवासी निवासाला नव्हते. छोटचा शिकाऱ्यातून ते हाऊसबोटीकडे गेले. हाऊसबोट म्हणजे सुसज्ज असा फ्लॅटच होता. प्रवेशदारातून आत जाताच तेथे नटलेला दिवाणखाना होता. तिथे छान विणीचे गालिचे अंथरले होते सोफासेट, टी-पॉय आणि त्यावर फुलदाणी ताज्या फुलांनी बहरली होती. एका कोपऱ्यात लहान अलमारी आणि रेडिओ होता. दारा-खिडक्यांना मोठमोठी भडक फुले असलेले

पडदे लावले होते. दोन झोपायच्या खोल्या, स्वयंपाकघर, बेसिन वगैरे वगैरे सर्व साग्रसंगीत होते. आपण पाण्यावर तरंगणाऱ्या घरात आहोत ह्याचा मागमूसही लागत नव्हता.

पपांनी पलंगावरची गादी सहज म्हणून उचलली तर त्याखाली एक पुडी सापडली. तसलीच पुडी बाथरूमच्या फळीच्या सापटीत पण मिळाली. पपा खानसाम्याला खडसावून म्हणाले,

'पॅसेंजर गेल्यावर सफाई कुणी केली ? ह्या कसल्या पुड्या आहेत ?'

खानसामा बिचारा घाबरून गेला. तो म्हणाला, 'दुपारी एक अनजान माणूस आला. तो म्हणाला, मी पहेलगामहून वड्या साहेबांकडून आलो आहे. ह्या पुड्या त्यांनीच ठेवायला सांगितल्या आहेत. आणिकसुद्धा चार-सहा पुड्या आहेत. मी त्या आणून देतो.' पुड्या देता देता तो म्हणाला, 'तो अनजान माणूस म्हणाला, की आज रात्री रमेशशेठ येऊन ह्या पुड्या नेतील. तोवर नवीन पॅसेंजर घेऊ नका.'

पपा पुटपुटले, 'अस्सं ! अशी भानगड आहे का ?

ते जरा चिंताक्रान्त झाले. रमेशविरुद्ध काय पवित्रा घ्यावा ? पोलिसस्टेशनला कळवावे काय ? कारण ह्या पुड्या म्हणजे चक्क गुंगी आणणाऱ्या परदेशी बनावटीच्या महाजालीम व दुर्मिळ गोळ्या होत्या. अर्थात त्या पुड्यांवरच्या लेबलमुळेच पपांना हे कळलं. त्यांनी त्या तत्क्षणी दाल सरोवरात फेकून दिल्या.

ते खानसाम्याला म्हणाले, 'रमेश आला की त्याला म्हणावं, मी इथं येऊन गेलो. त्या पुड्यांची मलाच गरज होती म्हणून मी त्या घेऊन गेलो आहे.' पुन्हा ते म्हणाले, 'तसं नको. आज मी हाऊसबोटीवर मुक्कामाला राहिलो आहे असं त्याला कळव म्हणजे

आज रात्री तो येणार नाही. त्याच्याऐवजी कोण येतं ते मला कळव.'

वीरेन्द्राला वाटले, खरं-खोटं, लांडी-लबाडी, फसवाफसवी गैरव्यवहार, बेकायदा वर्तन हेच शहरी श्रीमंत लोकांचं जीवन असतं का?

छे छे! हे शहरी जीवन, ही श्रीमंती मला नको– केव्हाही नको. दाल-रोटी सबसे अच्छी.

★

## अकरा

जेवढ्या आनंदाने आणि उत्सुकतेने वीरेन्द्र श्रीनगरला गेला होता तेवढ्याच उद्विग्न मनःस्थितीत तो परतला होता. आल्याबरोबर त्याने लछमनकाकाला सर्व गोष्टी सांगितल्या.

'काका, पपांची इच्छा आहे की मी हाऊसबोटीची व्यवस्था पाहावी. पण माझं मन काही तिथं रमणार नाही. मला श्रीनगर बिलकूल आवडलेलं नाही.'

लछमन म्हणाला, 'म्हणजे तुझ्या स्वभावाची कमालच आहे. भारताच्या कानाकोपऱ्यांतून लोक श्रीनगरला येतात. अरे, परदेशी लोकसुद्धा श्रीनगर पाहिल्याशिवाय परत मायदेशी जात नाहीत, आणि तुला म्हणे ते शहर आवडलं नाही. पिण्डे पिण्डे रुचिर्भिन्नः हेच खरं.

वीरेन्द्रा, तुला आपले शेठसाब तिथं राहण्याची बिलकूल सक्ती करणार नाहीत ह्याची खात्री बाळग.'

'कशावरून ?' वीरेन्द्र साशंकपणे म्हणाला.

केसांतून बोटे फिरवत बाजेवर बसता बसता लछमनकाका

म्हणाला, ' माझा तसा अनुभव आहे. मी खरं म्हणजे अत्यंत भडक डोक्याचा माणूस. मला चटकन राग येतो. पण ह्या सालस आणि सरळमार्गी शेठसाहेबानं मला सांभाळून घेतलं आहे.

मी ह्या व्यवहारी जगाला उबगलो आणि त्यांना म्हणालो होतो, की मला इथं काम नको. मी माझ्या खेड्यावर पुन्हा जातो. तर शेठसाब म्हणाले, लछमन, माझा माणूस म्हणून तू इथं रहा. तुला रुचेल ते काम कर. मी तुला अमुकच कामाची सक्ती करणार नाही. '

' असं ? मग नवलच आहे ! ' वीरेन्द्र बाजेजवळ लछमन-काकाचे पाय दाबीत बसला.

चाळा म्हणून उघड्या छातीवर तो हात फिरवीत म्हणाला, ' माझी सच्चाई, माझी धिटाई आणि प्रामाणिकपणा ह्यांचा शेठ-साबला चांगला अनुभव आलेला होता. मी इथं राहिलो म्हणून त्यांना समाधान वाटलं. '

त्याने जुनी हकीगत सांगितली. तो म्हणाला, ' मागं एकदा शेठसाबवर खुनी हल्ला झाला होता. मी माझ्या जिवाची पर्वा न करता मध्ये पडलो आणि त्यांच्यावर होणारा वार मी झेलला. ही पहा त्याची निशाणी. म्हणून त्यानं खांद्यावरच्या जखमेची खूण दाखविली. ' ह्यामुळे शेठसाबला माझा पहाडासारखा आधार वाटला आणि माझ्यावरचा विश्वास द्विगुणित झाला.

दुसरा ठळक प्रसंग म्हणजे शेठसाबचे वडील अत्यवस्थ होते तेव्हाचा. ' त्यांना तावडतोब दिल्लीला न्या,' असं डॉक्टर म्हणाले. बरोबर विश्वासू आणि कणखर मनाचा माणूस हवा म्हणून त्यांनी मला येण्यास सांगितलं.

घरी तर माझी घरवाली पण फार आजारी होती. मी तिला

सोडून जाणं योग्य नव्हतं. पण कर्तव्याच्या भूमिकेतून मी शेठसाब-बरोबर जायला निघालो. पहेलगामहून श्रीनगरला जाऊन पुढं दिल्लीला विमानानं गेलो, पण यश लाभलं नाही. 'ईश्वरेच्छा बलीयसी !' इकडे माझ्या घरवालीची योग्य ती शुश्रूषा शेठाणी म्हणजे टिनूच्या बांनी केली. स्वतःच्या आईसारखी त्या माऊलीनं तिची सेवा केली. ती मालकीण, आम्ही नोकर– असा भेदभाव केला नाही. वीरेन्द्र, अरे अशा देवमाणसांच्या सहवासात राहण्यात-सुद्धा फार आनंद असतो, समाधान असतं. हे समाधान ढीगभर पैशांत नाही, मानमरातबात नाही.

तेव्हा मी सांगतो ते ऐक. तू चांगला मुलगा आहेस. इथं राहण्यात तुझा फायदा आहे. अरे बाबा, चांगली माणसं मिळणं, त्यातल्या त्यात चांगला मालक मिळणं हे अत्यंत दुर्लभ आहे.' लछमनकाका बाजेवर आडवा होत वीरेन्द्राकडे हेतुपुरस्सर पाहत म्हणाला, 'तू टिनूचा लछमनकाका हो.'

दिवस चालले होते. वीरेन्द्राच्या शिक्षणाची घोडदौड चालू होती. टिनूचा सहवास त्याला हवासा वाटायचा. जणू धाकटा भाऊ जवळ असल्याचे समाधान लाभायचे.

ह्या हॉटेलजवळून वाहणाऱ्या लीदारचा प्रवाह उन्हाळ्यामुळे वाढला होता. वर हिमालयाच्या अंगाखांद्यावरचे बर्फ कडक उन्हामुळे भराभर वितळत होते.

पण अद्याप पपांच्या जिवाला चैन नव्हते. काहीतरी विपरीत घडणार ह्याची त्यांना हुरहूर लागली होती. व्यवसायात एवढा खंदा व्यापारी बच्चा, पण रमेशच्या कारवायांनी जेरीस आला होता. भक्कम पुरावा मिळत नव्हता. सांगोवांगीवर मनात आंदोलने वाढत होती.

कुणी सांगत होते, 'तो दारूचा राजरोस व्यवहार करतो.'
'बॉर्डरवरच्या कारवायांत ह्याचासुद्धा हात असतो.'

गांजा, चरस, अफू वगैरे व्यापारी आयात-निर्यात व्यवस्थित चालू आहे.'

रमेशच्या हातात पैसा यायला लागल्यापासून त्याला कृष्ण-कृत्ये करावीशी वाटू लागली. वाममार्ग हाच त्याच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. त्याला 'राजेन्द्र लॉज'मध्ये थोडी सत्ता मिळाल्या-बरोबर तो स्वभाव उफाळून वर आला.

त्याला सद्‌भाव, सत्संगती कधी भावणारच नाही. प्रथम तो नम्रपणे, आज्ञाधारकपणे वागायचा; पण स्वार्थ साधण्यासाठी ते नाटक होते. ह्या नाटकावर पडदा पडलाच पाहिजे.

एक दिवस बातमी आली की, पोलिसांनी लॉजवर छापा घातला व रमेशला अटक झाली. पपा तडक निघाले.

लछमन म्हणाला, 'शेठसाब, असे एकटे जाऊ नका. ह्या वीरेन्द्राला बरोबर घ्या. झाला तर त्याचा उपयोगच होईल.'

बेफामपणे गाडी श्रीनगरला आली व तिने राजेन्द्र लॉज गाठले.

तिथे पोलिस ऑफिसर्स त्यांची वाटच पाहत होते. त्यांनी रमेश-बद्दल त्याच्या धंद्यातल्या भागीबद्दल, इथे चालणाऱ्या गैरव्यवहारां-बद्दल पपाजवळ इत्थंभूत चौकशी केली.

पपा म्हणाले, 'तो माझ्या धंद्यातला भागीदार नाही, नुसता व्यवस्थापक आहे.'

त्यांना लॉजवर सापडलेल्या मालाची यादी दाखविली. पपा अवाक झाले. कल्पितापेक्षा सत्य भयाण होते.

ऑफिसर किंचित दरडावून म्हणाला, 'ह्या साऱ्या गोष्टी तुम्हाला माहीत असल्याच पाहिजेत ! खरं काय ते सांगा !'

पपा गडबडून गेले. ते म्हणाले, ' छे छे ! भलतंच काय बोलता ? '

वीरेन्द्र तिथेच उभा होता. त्याला वाटले, आपल्या मनात डाचणारी गोष्ट इथं पोलिसांना सांगायला हरकत नाही. तो शांतपणे म्हणाला ' माझ्या ऐकिवात असलेलं ठिकाण, की जे रमेशशी संबधित आहे, ते मी तुम्हाला सांगतो. तिथं तपास करून पहा. '

' कुठं ? म्हणजे तूसुद्धा ह्या भानगडीत सामील आहेस का ? ' दरडावणी वाढली होती,

वीरेन्द्र न घाबरता ताठपणे म्हणाला, ' मी सांगतो साहेब. आपण पूर्ण माहिती असल्याखेरीज दम भरू नका. मी तुम्हाला मदत करण्याच्या शुद्ध हेतूनं बोलतो आहे, ह्याचा अर्थ मीच गुन्हेगार आहे असं तुम्ही कसं म्हणता ? '


ऑफिसर नरमला. तो म्हणाला, ' तसं नव्हे. तू काय ते सांग बरं. '

पपा वीरेन्द्राच्या धिटुकल्या स्वभावाने आश्चर्यचकित झाले. माझ्यासारखा माणूससुद्धा पोलिस बडग्याला घाबरतो, पण हा पहाडातला अशिक्षित मुलगा निर्भयपणे कसा बोलतो आहे? आणि ह्याला माहीत असलेली हकीगत मला कशी कळली नाही ?

वीरेन्द्र म्हणाला, ' त्या दिवशी मी ' चार चिनार ' हॉटेलच्या लॉनवर एका बाजूला बसलो होतो... '

आणि त्याने त्या दिवशी ऐकलेली एकूण एक हकीगत सांगितली. जुन्या श्रीनगरच्या शेवटच्या गल्लीतले अबदुल्लाचे घर ही खूण त्याने सांगितली मात्र, पोलिस तुकडी वीरेन्द्र आणि पपांसह तिकडे रवाना झाली,

अबदुल्लाचे घर म्हणजे 'भूतघर' म्हणून प्रसिद्ध होते. ते तसे पडिकच घर होते. इथे म्हणे अबदुल्ला पिशाच्चाच्या रूपाने वावरतो आहे असा समज होता. त्यामुळे येण्याला कुणी धजावत नव्हते.



ते घर उघडले मात्र, अलिबाबाने गुन्हा उघडल्यावर त्याची जी अवस्था झाली तीच नेमकी अवस्था पोलिसांसह पपा आणि वीरेन्द्राची झाली. ह्या जागेत अनंत मौल्यवान वस्तूंचा साठा होता घड्याळे, विविध सेंट्स, परदेशी बनावटीचा कपडा, परदेशी टेपरेकॉर्डर्स, दारू, गांजा, चरस, सरकारी कर चुकविलेला माल– एक का दोन? अबब! मती गुंग झाली. पपांना तर चक्करच आली

पोलिस ऑफिसर म्हणाला, ' हा अस्तनीतला निखारा इतके दिवस कसा बाळगून ठेवलात ? अहो, तुम्ही सर्पाला दूध पाजत होता ! हा इसम बडा खतरनाक आहे. एक महत्त्वाचा साक्षीदार म्हणतो की हा रमेश तुमचा मुलगा पळविणार होता.

' काय ? टिनूला– माझ्या टिनूला..' पपांची बोबडीच वळली.

' होय. आणि त्या बदल्यात तो तुमच्याकडून पाच लाख रुपये खंडणी मागणार होता.' ऑफिसर म्हणाला.

वीरेन्द्राला ' चार चिनार'मधले रमेशने बरळलेले बोल आठवले. पाच लाख व बक्षिसी दहा-दहा हजार.

श्रीनगरमधले काम आटोपून वीरेन्द्र आणि पपा पहेलगामकडे निघाले. पपा तर अगदी सुन्न झाले होते.

वीरेन्द्राच्या डोक्यात थैमान चालू होते. गरीब स्वभावाचा टिनू...

ह्या नराधमाने त्याला पळविला असता तर त्याची काय अवस्था झाली असती ?


वंशाचा एकुलता एक दिवा ! घरच्या माणसांची तरी काय अवस्था झाली असती ? छे छे ! कल्पनासुद्धा करवत नाही.

आणि पपांनी त्याच्या मोबदल्यात पाच लाख दिले असते तरी त्यांनी त्याला सोडला असता काय ?

अजूनही टिनूचा धोका टळलेला नाही. तो रमेश– काळा रेडा– कधी ना कधी सुटणारच आणि मिळकतीचा एकमेव मार्ग म्हणून टिनूवर झडप घालणारच. डूख धरणाऱ्या नागोबाच्या जातीचा तो. खाल्ल्या अन्नाला कधीच स्मरणार नाही.

लछमनकाका म्हणतात तसा मी टिनूचा लछमनकाका होऊन त्याला जपायला हवं. टिनूनं मला विद्यादान केलं. पपांनी मला

अबदुल्लाचे घर म्हणजे 'भूतघर' म्हणून प्रसिद्ध होते. ते तसे पडिकच घर होते. इथे म्हणे अबदुल्ला पिशाच्चाच्या रूपाने वावरतो आहे असा समज होता. त्यामुळे येण्याला कुणी धजावत नव्हते.



ते घर उघडले मात्र, अलिबाबाने गुन्हा उघडल्यावर त्याची जी अवस्था झाली तीच नेमकी अवस्था पोलिसांसह पपा आणि वीरेन्द्राची झाली. ह्या जागेत अनंत मौल्यवान वस्तूंचा साठा होता. घड्याळे, विविध सेंट्स, परदेशी बनावटीचा कपडा, परदेशी टेपरेकॉर्डर्स, दारू, गांजा, चरस, सरकारी कर चुकविलेला माल— एक का दोन? अबब! मती गुंग झाली. पपांना तर चक्करच आली

पोलिस ऑफिसर म्हणाला, ' हा अस्तनीतला निखारा इतके दिवस कसा वाळगून ठेवलात ? अहो, तुम्ही सर्पाला दूध पाजत होता ! हा इसम बडा खतरनाक आहे. एक महत्त्वाचा साक्षीदार म्हणतो की हा रमेश तुमचा मुलगा पळविणार होता.

' काय ? टिनूला– माझ्या टिनूला.. ' पपांची बोबडीच वळली.

' होय. आणि त्या बदल्यात तो तुमच्याकडून पाच लाख रुपये खंडणी मागणार होता. ' ऑफिसर म्हणाला.

वीरेन्द्राला ' चार चिनार 'मधले रमेशने बरळलेले बोल आठवले. पाच लाख व बक्षिसी दहा-दहा हजार.

श्रीनगरमधले काम आटोपून वीरेन्द्र आणि पपा पहेलगामकडे निघाले. पपा तर अगदी सुन्न झाले होते.

वीरेन्द्राच्या डोक्यात थैमान चालू होते. गरीब स्वभावाचा टिनू...

ह्या नराधमाने त्याला पळविला असता तर त्याची काय अवस्था झाली असती ?

वंशाचा एकुलता एक दिवा ! घरच्या माणसांची तरी काय अवस्था झाली असती ? छे छे ! कल्पनासुद्धा करवत नाही.

आणि पपांनी त्याच्या मोबदल्यात पाच लाख दिले असते तरी त्यांनी त्याला सोडला असता काय ?

अजूनही टिनूचा धोका टळलेला नाही. तो रमेश– काळा रेडा– कधी ना कधी सुटणारच आणि मिळकतीचा एकमेव मार्ग म्हणून टिनूवर झडप घालणारंच. डूख धरणाऱ्या नागोबाच्या जातीचा तो. खाल्ल्या अन्नाला कधीच स्मरणार नाही.

लछमनकाका म्हणतात तसा मी टिनूचा लछमनकाका होऊन त्याला जपायला हवं. टिनूनं मला विद्यादान केलं. पपांनी मला

अन्नदान केलं. बा आणि दादीजींनी मला ममता दिली. त्यांचे उपकार मी स्मरायला नकोत का ?

पण त्यासाठी मला लछमनकाकासारखं इथंच सावलीसारखं राहायला हवं, गरिबीत दिवस कंठायला हवेत. पण मला गरिबीचा कधीच कमीपणा वाटत नाही. इथं आल्यापासून मला श्रीमंती दिसू लागली, पण त्यातला बेगडीपणा, ते खोटे मुखवटे आणि पोकळ प्रदर्शन ह्यांचा उबग आला आहे.

माझ्या स्वभावाला वरवरच्या भपक्यापेक्षा आतली विकृतीच चटकन लक्षात येते. मी वरल्या रंगाला भुलत नाही आणि कुणाच्याही मनाचा हिणकसपणा मला सहन होत नाही.

मला आता कर्तव्याचं वर्तुळ गवसलं आहे. मी टिनूचा लछमन-काका होऊन त्या निष्पाप, निष्कपट, निष्कलंक मुलाचं रक्षण केलं पाहिजे. तोच माझा धर्म आहे.

माझी माँ नेहमी म्हणते, की 'स्वधर्म आचरण हेच खरं जीवन.'

गाडी पहेलगामच्या हॉटेलाच्या आवारात आली होती. पूजा-घरात दादीजी गीतापठण करीत होत्या–

'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।'

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. १८६७ दिनांक २४।१।८६
विषय कादंबरी क्र. . . . . .

★ ★

BVBK-0401867